# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. २१ डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹


## आज अभिजीत कोसंबी अलिबागमध्ये

**पीएनपी संकुलात रंगणार प्रभाविष्कार**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपी शैक्षणिक संकुलाद्वारे 'प्रभाविष्कार' या सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन शनिवारी (दि.२१) सायंकाळी करण्यात आले आहे. महाराष्ट्राचा महागायक अभिजीत कोसंबी या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.पीएनपी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व अलिबागकरांना गाण्यांची मेजवानी या निमित्ताने मिळणार आहे. या सोहळ्यास संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील उपस्थित राहणार आहेत. अभिजीत कोसंबी यांनी झी मराठी या दूरचित्रवाणी वाहिनीवरील सारेगम संगीत स्पर्धेतील •➤ पान २ वर


## नर्सिंग असिस्टंट पाहिजे

**वात्सल्य ट्रस्ट शिशुगृह अलिबाग येथे पूर्णवेळ महिला नर्सिंगची आवश्यकता आहे. सदर उमेदवार ही नर्सिंग क्षेत्रातले शिक्षण झालेली व लहान मुलांबरोबर काम करण्याची आवड असलेली असावी.**

इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज व प्रमाणपत्र यासह संस्थेच्या कार्यालयात दिनांक २७/१२/२०२४ रोजी दुपारी १२.००वा. उपस्थित राहावे.

**पत्ता -वात्सल्य ट्रस्ट,घर नंबर १५१०/मयूर बेकरी मागे अलिबाग रायगड ४०२२०१**


**आजचा अग्रलेख**

**सागरी अपघातानंतर**

**वे|ध|क**

### राऊतांच्या घराबाहेर अज्ञातांकडून रेकी

**मुंबई :** शिवसेना ठाकरेंच्या पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्या मुंबईतील घराची शुक्रवारी (दि.२०) रेकी करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संजय राऊत यांच्या भांडुपमधील मैत्री बंगल्याच्याबाहेरदोनअज्ञातांकडून रेकी करण्यात आली. सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास हे दोन अज्ञात व्यक्ती राऊत यांच्या घराबाहेर रेकी करत असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून या प्रकाराबाबत पोलीस चौकशी करत आहेत. या घटनेनंतर संजय राऊत यांनी संताप व्यक्त केला आहे.

### सातपूर एमआयडीसीत कंपनीला आग

**नाशिक :** नाशिकमधील सातपूर भागातील एका कंपनीत शक्रवारी (दि.२०) मोठी आग लागली. आग लागल्यानंतर तातडीने अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. आग लागण्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आगीच्या घटनेत कोणी जखमी झालंय किंवा जिवितीहानीबद्दलही माहिती समोर आली नाही. सातपूर औद्योगिक वसातहीत ज्योतिष स्ट्रक्चर कंपनी आहे. या कंपनीत प्लास्टिक टाकीला भीषण आग लागली. काही वेळातच आगीने रौद्ररुप धारण केलं. आगीचा भडका उडाल्यानंतर धुराचे लोट परिसरातपसरले.आग लागल्याची माहिती समजतचात अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. बंबांच्या मदतीने पाऊण तासात अग्निशमन दलाने पूर्णपणे आटोक्यात आणली.

### अमेरिकेतील सरकारी कार्यालये बंद होणार?

**नवी दिल्ली :** अमेरिका सध्या गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी देशाकडे पुरेसा पैसा नाही. सरकारी कार्यालये बंद होण्याची स्थिती निर्माण झाली आहे. निधी उभारण्यासाठी अमेरिकन संसदेत एक विधेयक मंडण्यात आले, ज्याला राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाठिंबा दिला. मात्र, हे विधेयक संसदेत अपयशी ठरले.अमेरिकेला आपला खर्च भागवण्यासाठी निधीची गरज आहे. हा निधी कर्जातून उभा केला जातो, त्यासाठी संसदेत विधेयक मंजूर केले जाते. यावेळी ट्रम्प यांच्या पाठिंब्याने प्रस्तावित विधेयक मांडण्यात आले, मात्र ते मंजूर होऊ शकले नाही. याचा अर्थ अमेरिकन सरकारला आपल्या खर्चासाठी आवश्यक निधी मिळू शकणार नाही.

# लग्नघरी कोसळला दु:खाचा डोंगर

## ताम्हिणी घाटात भीषण अपघात | खासगी बस पलटी; ५ जणांचा मृत्यू,२७ जण जखमी

। माणगाव । सलीम शेख ।

**पुण्यातील लोहगाव येथील जाधवांच्या लग्नघरी आनंदाचा माहोल होता. पाहुण्यांची लगबग, चिल्यापिल्यांची धावपळ होती. हळदीला धम्माल करुन सारेजण पहाटे लग्नासाठी बिरवाडीला निघाले. आनंदाचे वातावरण होते. मात्र अशातच अनुचित प्रकार घडला आणि लग्नघरावर दुःखाचा डोंगर कोसळला. लग्नासाठी निघालेल्या बसचा शुक्रवारी (दि.२०) सकाळी दहाच्या सुमारास ताम्हिणी घाटात अपघात झाला. लग्नासाठी निघालेल्या पाचजणांचा मृत्यू झाला तर अन्य २७ जण जखमी झाले.**




### मयताची नावे

१) संगिता धनंजय जाधव
२) गौरव अशोक दराडे
३) शिल्पा प्रदिप पवार
४) वंदना जाधव
५) अनोळखी पुरुष अजून नांव निश्चित नाही.

पुण्याहून महाडला जाणारी वऱ्हाडी बस ताम्हिणी घाटात कोंडेथर गावच्या हद्दीत अपघातग्रस्त झाली. या दुर्घटनेत पाच प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला असून २७ जण जखमी झाले आहेत. लग्नासाठी निघालेल्या या बसचा भीषण अपघात झाला. माणगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले आहे.

मिळालेल्या माहितीनूसार, पुण्यातून महाड येथील बिरवाडीकडे लग्नासाठी निघालेली खाजगी बस क्र. एमएच १४ जीयु ३४०५ ही पुण्याहून माणगांवकडे येत असताना ताम्हिणी घाटात अवघड वळणावर आल्यानंतर रस्त्याच्या बाजूला पलटी झाली. हा अपघात इतका भीषण होता की, पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच माणगांव पोलिसांनी •➤ पान २ वर

### जखमींची नावे

१) सुप्रिया अरुण मांढरे वय ५५ वर्ष :- रेफर पुणे येथे
२) विजय चव्हाण वय ४६ वर्ष
३) अर्णव प्रशांत पवार वय
४) शशिकला बबन पवार वय ७१ वर्ष
५) सुधा अशोक माने वय ६० वर्ष :- रेफर पुणे येथे पत्ता:- शुक्रवार पेठ पुणे
६) संतोष मनोहर पार्टे वय ५५ वर्ष
७) वैभवी संतोष पार्टे वय २१ वर्ष पत्ता:- कळस पुणे
८) योगिता यशवंत कुचेकर वय ४४ वर्ष पत्ता :- पळस पुणे
९) तृप्ती संजय इंदुरे वय ४२ वर्ष
१०) मीरा आगावेकर वय ७० वर्ष
११) शार्दुल इंदूरे वय
१२) पायल मालुसरे वय २४ वर्ष पत्ता:- कळस पुणे
१३) सुवर्णा कुचेकर वय ४७ वर्ष पत्ता:- विश्रांती वाडी कळस पुणे
१४) सुनिता अशोक धनवडे वय ५० वर्ष :- रेफर पुणे येथे
१५) सुरेखा शांताराम जाधव वय ६४ वर्ष पत्ता:-औंध पुणे
१६) संगीता नामदेव जाधव वय ६२ वर्ष पत्ता :- औंध पुणे
१७) लिना प्रवीण पवार वय ४१ वर्ष पत्ता :- स्वारगेट पुणे
१८) जान्हवी राकेश सकपाळ वय १८ वर्ष पत्ता :- औंध पुणे
१९) अनिता शिवाजी पार्टे वय ४५ वर्ष पत्ता:- येरवडा पुणे
२०) श्राव्या प्रवीण पवार वय १२ वर्ष
२१) रुपाली धनावडे वय ३० वर्ष पत्ता:- दांडेकर पूल राजेंद्रनगर पुणे
२२) समर्थ धनावडे वय ३.५ वर्ष
२३) सविता संतोष पार्टे वय ४८ वर्ष पत्ता:- कळस पुणे
२४) प्रियंका कृष्णा तुरडे वय ३४ वर्ष पत्ता:- राजेंद्र नगर पुणे
२५) युवराज कृष्णा तूरडे वय ११ वर्ष पत्ता:- राजेंद्र नगर पुणे
२६) द्रोना गौरव धनावडे वय ०८ वर्ष
२७) रोहिणी शिवाजी जगताप वय ५० वर्ष पत्ता:- खडकी पुणे
२८) तनिषा गिरीश जाधव वय १६ वर्ष

## फसवणूक प्रकरणातील बंटी-बबलीला अटक

। उरण । प्रतिनिधी ।



उरणमधील जुगनू कोळी आणि तेजस्वी कोळी या बंटी-बबलीच्या जोडीने नेरुळ, सीवूड्स येथे राहणाऱ्या डॉक्टर दांपत्याला तब्बल ३ कोटी ३० लाखांचा गंडा घातल्याची घटना घडली होती. याबाबत नवी मुंबई, एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. यातील आरोपींना न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारल्यानंतर परदेशात पलायनाच्या प्रयत्नात असताना, या जोडीला दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानातळावरून अटक करण्यात आली आहे.

मुलांना परदेशात शिक्षण आणि डॉक्टर दांपत्याला नोकरी देतो, असे सांगून, लिव्ही ओव्हरसीज स्टडीज प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेच्या माध्यमातून संस्थेचे संस्थापक जुगनू कोळी आणि तेजस्वी कोळी यांनी कोट्यवधी रुपये उकळले असल्याबाबत उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यातील आरोपी बंटी, बबलीने अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात दाद मागितली होती. मात्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन फेटाळला होता.

यामुळे कारवाईला सामोरे जावे लागू नये, म्हणून परदेशात जाण्याचा प्रयत्न केला असता, •➤ पान २ वर

## मुंबईत १५ कोटींचे ड्रग्स जप्त

। मुंबई । प्रतिनिधी ।

नवीन वर्षाच्या आगमनास काही दिवस राहिले आहे. तरुणाई नवीन वर्षांच्या स्वागतासाठी उत्सुक असते. यामुळे ३१ डिसेंबर रोजी मोठ्या प्रमाणावर दारुची विक्री होत असते. तसेच अनेक ठिकाणी ड्रग्सही विकले जाते. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमिवर अंमली पदार्थ नियंत्रण विभाग (एनसीबी) विभाग सक्रीय झाला आहे. एनसीबीने मुंबईत मोठी कारवाई करत ५ कोटी २० लाखांचे ड्रग्स जप्त केले आहे. दोन कारवाईत हे ड्रग्स जप्त करण्यात आले आहे.

मुंबईतल्या एका फ्लॅटमध्ये गांजाची झाडे उगवून त्यातून त्याची तस्करी होत असल्याचेही समोर आले होते. •➤ पान २ वर

## कंपनीत स्फोट; ९ कामगार जखमी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगडमधील महाड एमआयडीसीमधील ॲस्टेक लाईफ सायन्स लिमिटेड या कंपनीत गुरुवारी (दि.१९) एका कंपनीत झालेल्या स्फोटात ९ कामगार जखमी झाले आहेत. यामुळे एमआयडीसीमधील कंपन्यांच्या दुर्घटनांचा आणि कामगारांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान,



महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार केल्यानंतर सर्व कामगारांना गुरुवारी संध्याकाळी घरी सोडण्यात आले. महाड •➤ पान २ वर

### अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल

स्फोटाच्या तीव्रतेने प्लांटचे पत्रे आणि लोखंडी तुकडे लागून कामगार जखमी झाले. या घटनेची पोलिसांनी माहिती घेतली असता येथील कामगारांना कोणतीही सुरक्षा उपकरणे दिली नसल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी प्लांटचे मुख्य निरंजन अविनाश बर्डे, सुरक्षा अधिकारी ऋषिकेश प्रकाश भोज, शिफ्ट अधिकारी संकेत गोविंद मोरे, एचआर व्यवस्थापक गौरी जितेंद्र तेलंगे, सुरक्षा परवानगी देणारे अधिकारी अनिल केशव देसाई, प्लांट मुख्य अधिकारी अनंत अशोक मुळे, अभिजीत थरवळ, योगेश देशमुख, रहातेकर या ९ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## टँकरचा स्फोट; प्रवासी बस जळाली

। जयपूर । वृत्तसंस्था ।



जयपूरमध्ये एलपीजी टँकरच्या स्फोटात ३४ प्रवासी असलेली स्लीपर बसही जळाली. ३४ प्रवाशांपैकी २० प्रवासी होरपळले आहेत. दरम्यान, १४ प्रवासी आणि ड्रायव्हर-कंडक्टर बेपत्ता आहेत. टँकरच्या स्फोटानंतर लागलेल्या आगीच्या ज्वाळा इतक्या मोठ्या होत्या की अनेक पक्षीही दगावले. बस आणि ट्रकसह महामार्गावरील अनेक वाहनांनाही आग लागली. आगीच्या उकाड्यामुळे दुचाकीस्वाराचे हेल्मेट चिघळून चेहऱ्याला चिकटले आणि त्याचे डोळेही भाजले.

लेकसिटी ट्रॅव्हलची बस गुरुवारी रात्री नऊ वाजता उदयपूरहून निघाली. त्यावेळी बसमध्ये ३५ प्रवासी होते. अजमेर येथे एक प्रवासी उतरला होता. ही बस जयपूरला सकाळी ६.३० वाजता पोहोचणार होती, पण पहाटे ५.४५ वाजता अपघात झाला. बसमधील प्रवाशाने सांगितले की, अचानक बसला आग लागली.

बसच्या मुख्य गेटलाही कुलूप होते. त्यामुळे लोकांना बाहेर येण्यास उशीर झाला आणि अनेकांचा मृत्यू झाला. या अपघातात बस चालकाला पहिला फटका बसला. घटनास्थळी २ ते ३ किलोमीटर परिसरात रस्त्यावर उभी असलेली सर्व वाहने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. यानंतर सुमारे तासभर स्फोटांचे आवाज ऐकू आले. हवेत वेगाने पसरणाऱ्या वायूमुळे हा अपघात भीषण झाला. शेजारी राहणाऱ्या लोकांनी सांगितले की, स्फोट ऐकून ते बाहेर आले तेव्हा लोक इकडे तिकडे धावत होते.

**मुंबई स्पेशल ब्रांचच्या धर्तीवर राबविणार अभिनव उपक्रम**

# सोशल मिडीया लॅबद्वारे राहणार भुरट्यांवर नजर

## कोकणचे विशेष पोलीस महानिरीक्षक दराडे यांची संकल्पना

। अलिबाग । प्रमोद जाधव ।



सोशल मिडीयाच्या आहारी जाणाऱ्यांना गंडा घालणारी टोळी सक्रिय झाली आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोकणचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांच्या संकल्पनेतून कोकणातील पाचही जिल्ह्यात सोशल मिडीया लॅब (समाज माध्यम नियंत्र कक्ष) उभारले जाणार आहे. मुंबई स्पेशल ब्रांचच्या धर्तीवर राबविणार अभिनव उपक्रम राबविणार असून त्याठिकाणी अद्यायावत अशा सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत. जिल्हा नियोजन समितीकडून निधीची तरतूद केली जाणार आहे. या उपक्रमातून सोशल मिडीयाद्वारे होणारे गुन्हे रोखण्यास मदत होणार आहे.

फेसबुक आणि व्हॉट्स ॲपबरोबरच इंस्ट्राग्राम व इतर सोशल मिडीयाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढू लागला आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठ मंडळी, तरुण मंडळी सोशल मिडीयाच्या प्रचंड जाऊ लागली आहे. सोशल मिडीयातील वेगवेगळे व्हीडीओ व स्कीम बघण्यामध्ये तरुणाई प्रचंड वेळ वाया घालवत आहे. सोशल मिडीयाद्वारे मेसेज पाठवून अनेक •➤ पान २ वर

### सागरी सुरक्षेसाठी पावले उचलणार

कोकण पर्यटनाचा भाग आहे. पर्यटन हा महत्वाचा भाग आहे. पर्यटनामुळे विकास वाढणार आहे. काही मंडळी याच पर्यटनाचा आधार घेत अंमली पदार्थ तस्करी, व इतर गैरप्रकार करतात. त्यांच्याविरोधात कारवाई सुरु आहे. सागरी सुरक्षेसाठी कडक कारवाई केली जाणार आहे. सागरी सुरक्षेसाठी अधिक कडक पावले उचलली जाणार असल्याचे कोकणचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दरडे म्हणाले.





| प्रकार | वाहनाचे टनेज** | प्रत्येक वाहनासाठी इन्सेंटिव्ह* |
|---|---|---|
| अवजड व्यावसायिक वाहन (एचसीव्ही) | >15 | ₹4,50,000 |
| मध्यम व्यावसायिक वाहन (आयसीव्ही) | >10, <15 | ₹3,15,000 |
| हलके व्यावसायिक वाहन (एलसीव्ही) | >3.5, <10 | ₹1,80,000 |
| बस | लागू नाही | ₹2,70,000 |

# ट्रॅव्हल्सचा परिणाम एसटीच्या व्यवसायावर

**। पनवेल । वार्ताहर ।**

बसस्थानकाच्या दोनशे मीटरच्या परिघात खाजगी वाहनांना नो एंट्री करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने या आधीच दिले आहेत. याबाबत या आधी वाहतूक शाखेने धडक मोहीम हाती घेतल्याने काही खाजगी ट्रॅव्हल्स बसस्थानकासमोरून न जाता पुलावरून जात असून रात्रीच्या वेळी खाजगी ट्रॅव्हल्स बसेस बसस्थानकाजवळील उड्डाणपुलाखाली उभ्या राहत असून एसटी महामंडळाचे प्रवासी खाजगी बसने प्रवास करत असल्याने एसटीचे मोठ्या प्रमाणात नुकसान तर होतच आहे .परंतु बस महामार्गाशेजारी बेकायदेशीर उभ्या राहत असल्याने भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही .

पनवेलहून पुणे, सोलापूर, सातारा, कऱ्हाड, सांगली, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर, कोल्हापूर, कोकण, गोवा, सुरत, अहमदाबाद आदी ठिकाणी खासगी ट्रॅव्हल्स जातात. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, कोकण अशा राज्यातील विविध भागात मुंबईहून थेट या खाजगी बसेस सोडण्यात येतात. पनवेल बसस्थानकापासून जास्तीत जास्त ४० ते ५० मीटर अंतरावर रात्रीच्या वेळी मोठया प्रमाणात खाजगी ट्रॅव्हल्स थांबत आहेत . एसटीचे प्रवाशी गेल्या अनेक वर्षापासून पळवीत असल्याचे महामंडळाचे म्हणणे होते. त्यामुळे एसटीच्या हातून हजारो प्रवासी तर जात होते त्याचबरोबर लाखो रूपयांचा तोटा होत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. माजी परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी राखीव झोनची घोषणा केली होती. पनवेल बसस्थानकाच्या बाजूच्या खाजगी ट्रॅव्हल्स व इतर वाहनांच्या थांब्यावर आगार व्यवस्थापनाने सातत्याने आक्षेप नोंदवत संबधितांवर कारवाई करावी अशा मागणीचे पत्र कित्येकवेळा पनवेल वाहतूक शाखा आणि नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात पाठविण्यात आले आहेत. ही परिस्थिती केवळ पनवेलच नाही तर इतर ठिकाणी सुध्दा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बसस्थानक व बसथांब्यापासून दोनशे मीटरच्या परिघात खाजगी वाहनांना उभे राहण्यास मनाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले. वाहतूक पोलिसांच्या कारवाईच्या धसक्याने पनवेल बसस्थानकासमोर उभ्या राहणाऱ्या ट्रॅव्हल्स आता नवीन पनवेल सिग्नलजवळ उभ्या केल्या जात आहेत.

**पनवेलहून सुटणाऱ्या अनेक खासगी गाड्यांचे दर अधिक आहेत. कोकणात जाणाऱ्या गाड्याचे तिकीट दर दीड ते दोन हजार रुपये आहे. तर पुणे-सातारा-सांगली पट्ट्यात देखील खासगीच्या तिकिटाला हजारो रुपयांचा दर आलेला आहे. एसटी भाड्याच्या दीडपटापेक्षा अधिक भाडे खासगी ट्रॅव्हल्सचे नसावे. यापेक्षा अधिक भाडे आकारल्यास खासगी चालक-मालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. भाड्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी प्रादेशिक परिवहन (आरटीओ) विभागाची आहे.**



# संत गाडगे बाबा यांची पुण्यतिथी साजरी



**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

संपूर्ण महाराष्ट्राला स्वच्छते विषयी जनजागृती करणारे व कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा दूर करणारे महान संत गाडगे बाबा महाराज यांची पुण्यतिथी आज नांदगाव हायस्कूल येथे साजरी करण्यात आली.

यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी संत गाडगे महाराज यांच्या विषयीचे विचार सादर केले. तसेच अनेक शिक्षकांनी गाडगे महाराज यांच्या विषयी मुलांना माहिती सांगितली.

यावेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत यांनी संत गाडगे महाराज यांनी समाजातील अंधश्रद्धा दूर करून स्वछता किती महत्वाची आहे.हे त्या काळात पटवून दिले होते.त्यांच्यासारखा संत यापुढे होणे नसून आपण सर्वांनी त्यांचा आदर्श बाळगला पाहिजे. अंधश्रद्धेपासून दूर राहून शिक्षणाची कास पकडली पाहिजे. पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांनी स्वच्छता हा मानवी जीवनातील महत्वाचा अंग असून आपण आपले घर जसे स्वच्छ ठेवतो त्याचप्रमाणे आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. स्वच्छता ठेवल्याने रोगराईपासून आपण दूर राहणार आहोत.यासाठी संत गाडगे महाराज यांचा आदर्श बाळगू या असा संदेश यावेळी त्यांनी दिला.

# निवासी शिबीराचे उद्घाटन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

कोकणएज्युकेशनसोसायटीच्या नागोठण्यातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या, राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजीत निवासी श्रमसंस्कार शिबीराचे उद्धाटन रोहा येथील डॉ. सी. डी. देशमुख महाविद्यालयाचे चालू आहे प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



यावेळी पिगोंडे ग्रामपंचायतचे माजी सरपंच संतोष कोळी, वेलशेत - आंबेघर येथिल पोलीस पाटील, मनिषा पाटील, महिला मंडळ अध्यक्ष स्मिता ताडकर, माजी उपसरपंच कांचन माळी ग्रामपंचायत प्रशासकीय अधिकारी विजय आहिरे को. ए. सो. उप प्रशासकीय अधिकारी डॉ. संदेश गुरव, महाविद्यालयीन प्राध्यापक डॉ. विजय चव्हाण, डॉ. विलास जाधवर, प्रा. जयेश पाटील, डॉ. विकास शिंदे, डॉ.राणी ठाकरे, प्राची दांडेकर आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थी वर्गाने राष्ट्रीय सेवा योजनाकडे एक संधी म्हणून पाहिले पाहिजे. कारण या प्लॅटफॉर्मद्वारे विद्यार्थ्यांना व्यक्तीमत्व विकास, नेतृत्व, गुण विकसित करण्याची संधी मिळते. फक्त मार्क मिळतात म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेकडे पाहू नका. या प्रसंगी प्रा. डॉ.संदेश गुरव यांनी शिबिराप्रमाणे महाविद्यालयातील वर्गात विद्यार्थी दिसावेत ही अशा व्यक्त केली. प्रा. डॉ.श्रीकृष्ण तुपारे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर आभार प्रदर्शन डॉ. मनोहर शिरसाठ यांनी व्यक्त केले.

या श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि. १९ ते २५ डिसेंबर २०२४ दरम्यान करण्यात आले आहे. या सात दिवसात शिबिरात श्रमदान, बंधारा, क्रीडा स्पर्धा, महिला मेळावा बुवाबाजी प्रयोग, पथनाट्य आदींसह अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सात दिवसात विविध विषयांवर मान्यवर तज्ञ अभ्यासकांचे व्याख्याने आयोजित केलेली आहेत. शेवटच्या दिवशी सामाजिक संदेश देणाऱ्या विषयांवर पथनाट्य सादरीकरण व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हे श्रमसंस्कार शिबीर यशस्वी होण्यासाठी कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिनेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे व प्रा. डॉ. मनोहर शिरसाठ मेहनत घेत आहेत.

## आर्थिक जागरूकता कार्यक्रम संपन्न

**श्रीवर्धन** : महर्षी कर्वे आदर्श महाविद्यालयात विद्यार्थिनींमध्ये आर्थिक नियोजन, व्यवस्थापन आणि जोखीमविरहित गुंतवणूक करण्याबाबत साक्षरता निर्माण व्हावी या उद्देशाने क्रिषा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.दत्तात्रय राणे यांनी ऑनलाईन पद्धतीने वेबिनारचे आयोजन करून विद्यार्थिनींना एक नवे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.या वेबिनारमध्ये स्मार्ट प्रशिक्षक प्रवीण धुरी यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सहा.प्राध्यापकतृप्ती विचारे यांनी केले.तर ऋषिकेश चोगले यांनी आभार प्रदर्शन केले. महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापक वर्गाने या वेबिनारमध्ये उत्स्फूर्त सहभाग दर्शविला.

# ताम्हाणे येथे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन

**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव येथील जे.बी.सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत भारतीय संविधानाचा हिरक म होत्सव, स्वच्छ भारत अभियान, सुदृढ भारत अभियान, भारतासाठी युवक या अभियानावर आधारित ७ दिवशीय विशेष निवासी श्रम संस्कार शिबीर २०२४ - २५ चे आयोजन तालुक्यातील ताम्हाणे गावात गुरुवार दि.१९ डिसेंबर ते बुधवार दि.२५ डिसेंबर २०२४ दरम्यान करण्यात आले असून या शिबिराचे उद्‌घाटन १९ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता महाविकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हा समन्वयक तुलसीदास मोकल, प्राचार्य हर्षल जोशी, ताम्हाणे पोलीस पाटील शशिकांत मोरे, ग्रामस्थ बळीराम धाडवे, सुरेश मोरे, चंद्रकांत धाडवे, अशोक जाधव, रामदास धाडवे, पांडुरंग मोरे, धोंडिराम पवार, महाविद्यालयाचे शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

सात दिवस चालणाऱ्या या शिबिरात सकाळी ६ ते ७:१५ - योगा, व्यायाम व प्राणायाम, ७:१५ ते ७:४५ प्रार्थना व हजेरी, ७;४५ ते ९ - चहा व अल्पोपहार, ९ ते १ श्रमदान, दुपारी १ ते ३:३० भोजन व विश्रांती, ३:३० ते ४ - नियोजित कार्यक्रमाची तयारी, ४ ते ५:३० व्याख्यान, चर्चासत्र , प्रबोधनपर, कार्यक्रम, ५:३० ते ६ चहा , खेळ, रात्री ६ ते ८ समूह चर्चा, ८ ते ९ भोजन, ९ ते १० दैनंदिनी लिखान व सांस्कृतिक कार्यक्रम,१० दिवे बंद (विश्रांती ) असा दैनंदिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

या शिबिरात व्याख्याते विद्यार्थ्यांना व्याख्यान देणार असून अनेक मान्यवर मंडळी या शिबिराला भेट देणार आहेत. या शिबिराची कॉलेजचे प्राचार्य हर्षल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. जगदीश शिगवण, प्रा.अशोक मोरे, प्रा.डॉ. नितीन मुटकुळे व सहकाऱ्यांनी जय्यत तयारी केली आहे.

# मोफत आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

**। उरण । वार्ताहर ।**

रयत शिक्षण, संस्थेच्या वीर वाजेकर, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, अपोलो हॉस्पिटल,बेलापूर व लायन्स क्लब आणि लायन्स क्लब द्रोणागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

आपोलो हॉस्पिटल बेलापूर येथील डॉ.निलेश भराडे, विठ्ठल वाडकर, वैशाली सोजे, मेहूल जखवाले, संगीता सिंग, श्रेया सुतार, दिव्या चौधरी यांनी विद्यार्थ्यांची तसेच इतर लोकांची आरोग्य तपासणी केली. तपासणी अंतर्गत वजन, उंची, रक्तदाब, रक्तातील साखर नेत्र तपासणी, ई. सी.जी. तपासणी करण्यात आली.महाविद्यालयातील विद्यार्थी, बाह्यरुग्ण,माजी विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापक व सेवक, तु.ह. वाजेकर ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मोफत आरोग्य तपासणी करून घेतली. महाविद्यालयातील प्राध्यापक व सेवकांनी आरोग्य तपासणी करून घेतली.आरोग्य तपासणी दरम्यान 'अवयवदान' याविषयावर प्रार्थना नाथ यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य,डॉ.आमोद ठक्कर यांनी सर्व डॉक्टर,तसेच लायन्स क्लब द्रोणागिरी यांचे मनापासून स्वागत व आभार मानले. या संपूर्ण आरोग्य तपासणीसाठी लायन्स क्लब द्रोणागिरी, अपोलो हॉस्पिटल यांचे विशेष सहकार्य लाभले. उपप्राचार्य, प्रा.दिलीप केंगार, प्रा.गजानन चव्हाण, डॉ. संदीप घोडके, डॉ. राहुल पाटील उपस्थित होते. प्रा.योगेश कुलकर्णी, प्रा.भूषण ठाकूर, प्रा.प्रांजल भोईर, प्रा.संतोष देसाई, प्रा.पंकज भोये, डॉ.रत्नमाला जावळे यांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रीय सेवा योजनेचे रिद्धी तांडेल, शुभम ठाकूर सिद्दी शिंदे, सुरेखा म्हात्रे यांनी आयोजनात मदत केली.

# चार नवीन स्मशानभूमींसाठी पनवेल महापालिकेचा १० कोटींचा निधी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये तळोजा वसाहतीमध्ये दोन ठिकाणी, कोयनावेळे आणि घोट या चार ठिकाणी नवीन स्मशानभूमीचे बांधकाम पालिका प्रशासन करणार आहे. यासाठी पालिका १०.६८ लाख रुपये खर्च करणार आहे. नुकतीच याबाबतची निविदा जाहीर करण्यात आली.

तळोजा वसाहतीमध्ये हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मातील नागरिकांसाठी स्मशानभूमीसाठी विविध राजकीय पक्षांना जन आंदोलने उभारावी लागली. पालिका प्रशासनाने सिडको मंडळाकडून संबंधित भूखंडाचे हस्तांतरण झाल्यानंतर हे भूखंड ताब्यात घेऊन त्यावर विकासकामांची सुरुवात केली आहे. तळोजा फेज एक येथील सेक्टर १५ येथील भूखंड क्रमांक १० वरील १४९९.५३ चौरस मीटर क्षेत्र, तळोजा फेज २ मध्ये ५७८ चौरस मीटरचा भूखंड, कोयनावेळे येथील १२६१ चौरस मीटरचा भूखंड आणि घोट येथील ५७६.५३ चौरस मीटर भूखंडावर स्मशानभूमीसाठी बांधकाम करणार आहे.

स्मशानभूमीसाठी कोयनावेळे, घोट आणि तळोजा वसाहतीमध्ये दोन ठिकाणी आरक्षित भूखंडाचे हस्तांतरण प्रक्रिया सिडको मंडळाकडून पार पडल्याने महापालिका आयुक्तांनी निर्देशित केल्याने संबंधित विकासकामे निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर केली जाणार आहेत, असे शहर अभियंता संजय कटेकर म्हणाले.

# माजगावात रक्तदान शिबीर, कापडी पिशव्यांचे वाटप

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिक परिसर असल्याने येथे कारखानदारी व लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यासाठी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट ,पिल्लई एचओसी कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय मोहोपाडा रसायनी , टाटा मेमोरियल कॅन्सर सेंटर खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर व कापडी बॅग वाटप शिबीर २० डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले होते.

यावेळी पन्नासपेक्षा जास्त नागरिकांनी रक्तदान हेच श्रेष्ठ दान समजून रक्तदान केले.यावेळी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन संस्थेकडून पर्यावरण संरक्षणासाठी प्लास्टिक विरोधात मोहीम राबवून नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच दिपाली पाटील, उपसरपंच राजेश पाटील, अरुण जाधव, नरेश पाटील, कलावती उपाध्याय, गौतम कांबळे शिक्षक आदी मान्यवरांसह नागरिक उपस्थित होते.

पान १ वरून

## आज अभिजीत कोसंबी अलिबागमध्ये

त्यांनी पहिले महागायक होण्याचा सन्मान मिळवला आहे. गझलकार, संगीतकार, गीतकार म्हणून त्यांनी कमी कालावधीत नाव लौकीक केला आहे.

पीएनपी शैक्षणिक संकुलाद्वारे ङ्गप्रभाविष्कारफसोहळा रंगणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव दिला जाणार आहे. २१ डिसेंबरला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात सायंकाळी साडेसहा ते ते रात्री दहा वाजण्याच्या सुमारास विविध गुणदर्शन कार्यक्रम आणि महागरबाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व कार्यक्रम पीएनपी संकुलात होणार असून प्रवेश विनामूल्य आहे. भव्यदिव्य स्वरुपात होणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा पाहण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन पीएनपी संकुलाच्या वतीने करण्यात आले आहे.

## लग्नघरी कोसळला दुःखाचा डोंगर

तातडीने घटनास्थळ गाठले. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ताम्हिणी घाटात हा बस अपघात सकाळी दहाच्या आसपास झाला. माणगाव पोलीस स्टेशन हद्दीत ताम्हीणी घाटात ट्रॅव्हल्सची खासगी बस पलटी होऊन अपघात झाला. जाधव कुटुंबीय लोहगाव पुणे येथून बिरवाडी महाड येथे लग्न समारंभास जात होते. यादरम्यान ताम्हीणी घाटातील धोकादायक वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने सदर बस पलटी झाली आहे.

## कंपनीत स्फोट;९ कामगार जखमी

एमआयडीसीमधील ॲस्टेक लाईफ सायन्स लिमिटेड या कंपनीत गुरुवारी दुपारी स्फोट झाला. यात रितेश रामदास निंबरे (१९, कोटेश्वरी तळे महाड), वसंत दगडू जंगम (४३, बिरवाडी, महाड), आर्यन राजीव रॉय (२०, चांभारखिंड, महाड), दिनेश गणपत म्हसळकर (२१, गोरेगाव, माणगाव), प्रशांत गोविंद चाचले (२२, धारवली, पोलादपूर), प्रथमेश दत्ताराम मुसळकर (२३, गोरेगाव, माणगाव), रामचंद्र, गुलाबचंद आणि तेजस निंबरे असे ९ जण जखमी झाल्याची माहिती महाड एमआयडीसी पोलिसांकडून मिळाली आहे.

ॲस्टेक लाईफ सायन्स लिमिटेड या कारखान्यात दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास रिॲक्टरचा स्फोट झाला. त्यात एक कामगार किरकोळ जखमी झाला होता. यावेळी कंपनी प्रशासनाकडून रंगीत तालीम असल्याचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न करण्यात येत होता. मात्र, या स्फोटाची तीव्रता एवढी मोठी होती की, त्याचा आवाज तीन किलोमीटरपर्यंत पसरला. या घटनेची माहिती मिळताच महाड एमआयडीसी पोलीस, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी घटनास्थळी तत्काळ दाखल झाले. त्यावेळी ही रंगीत तालीम नसून दुर्घटना असल्याचे स्पष्ट झाले.

## फसवणूक प्रकरणातील बंटी-बबलीला अटक

या जोडीला दिल्ली विमानतळावर अटक करून ताब्यात घेण्यात आले आहे. न्यायाल्याने या प्रकारानंतर तेजस्वी कोळी हिला न्यायालयीन कोठडी दिली असून, जुगनू कोळी याला पुढील तपासासाठी तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या संपूर्ण प्रकारामध्ये डॉक्टर दाम्पत्याच्या दोन्ही मुलांचे दोन शैक्षणिक वर्षांचे नुकसान झाले आहे. याबाबत नवी मुंबई एनआरआय पोलीस ठाण्यात कलम ४०६, ४२०, ४६५ अन्वये गुन्हा दाखल आहे.

## मुंबईत १५ कोटींचे ड्रग्स जप्त

एनसीबीला डार्क वेबच्या माध्यमतून ही गांजा तस्करी होत असल्याचे समजले. त्यानंतर एनसीबीने छापा टाकून मुंबईतून आरोपीला अटक केली आहे.डार्क वेब ओनियन राउटिंग तंत्रज्ञान आहे. या तंत्रज्ञानामुळे युजरजी गोपनीयता कायम ठेवली जाते. या तंत्राचे वापर करणाऱ्या युजरला ट्रॅक करता येत नाही. डार्क वेब अनेक आयपी अ‍ॅड्रेसमधून कनेक्ट आणि डिस्कनेक्ट होते, ज्यामुळे ट्रॅक करणे अशक्य होते. बिटकॉइनसारख्या आभासी चलनाचा वापर डार्क वेबवर व्यवहार करण्यासाठी केला जातो.

**दुसरी कारवाई विमानतळावर**

एनसीबीने दुसऱ्या कारवाईत मुंबई विमानतळावर थायलंडमधून भारतात येणारे ड्रग्स पकडले. या तस्करीत मोठे रॅकेट असल्याचे उघडकीस आले आहे. थायलंडमधून बँकॉक आणि नंतर मुंबईत आलेले ड्रग्सचे पार्सल एनसीबीने पकडले आहे. त्यातून १३ किलो हायब्रिड स्ट्रेन गांजा सापडला आहे. या गांजाची तस्करी करण्यात कोल्हापूरची एक व्यक्ती असल्याचे समोर आले. त्या संशयित व्यक्तीला एनसीबीने अटक केली आहे. दोन वेगवेगळ्या कारवाईत १५ कोटी २० लाखांचे ड्रग्स जप्त झाले.

काही दिवसांपूर्वी नवी मुंबई शहरामध्ये बारा कोटी रुपयांचा ड्रग्स जप्त करण्यात आले होते. नवी मुंबई गुन्हे शाखाने विविध भागात २५ ठिकाणी छापेमारी केली होती. त्यात अंमली पदार्थ विरोधी कारवाईच्या अंतर्गत १३ नायजेरियन लोकांना पोलिसांनी घेतले. तसेच तीन नायजेरियनकडे कागदपत्रे नसल्याने त्यांना ताब्यात घेतले होते. नायजेरियनकडून पोलिसांनी बारा कोटी रुपयांचे ड्रग्स मिळाले होते.

## सोशल मिडीया लॅबद्वारे राहणार भुरट्यांवर नजर

तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढण्याच्या घटना घडू लागल्या आहेत. सोशल मिडीयाद्वारे अनेकांना आर्थिक गंडादेखील घातला जातो. जिल्ह्यात अशा प्रकारच्या घटना दिवसेंदिवस वाढू लागल्या आहेत. नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबरोबरच या गुन्हयांवर अंकुश ठेवण्यासाठी रायगड, पालघर, ठाणे, रत्नागिरी, सिंधूदुर्ग या जिल्ह्यात सोशल मिडीया लॅब उभारली जाणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांना सुचना केल्या आहेत. जिल्हा नियोजन समितीकडून सुमारे तीस लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्याचा प्रस्ताव पाठविण्यास सांगण्यात आला आहे.

सुस्सज अशा सोशल मिडीया लॅबमध्ये संगणक, सॉफ्टवेअरची सुविधा असणार आहे. संगणक, तांत्रिक शिक्षण घेणारे व इंजिनिअर असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश केला जाणार आहे. त्यांना महाराष्ट्र पोलीस ॲकेडमी व राष्ट्रीय पोलीस ॲकडेमी मार्फत प्रशिक्षण दिले जाणार आहे. सोशल मिडीयाचा गैरवापर करून फसवणूक करणाऱ्यांबरोबरच सोशल मिडीयाचा गैरवापर करण्यांवर या लॅबद्वारे लक्ष ठेवण्याचे काम केले जाणार आहे. रायगडसह कोकणातील पोलीस दलामध्ये सोशल मिडीया लॅब लवकरच कार्यान्वीत केली जाणार असल्याची माहिती संजय दराडे यांनी दिली.

**डिजीटल अरेस्टचा प्रकार शंभर टक्के खोटा**

बँक खात्यातून अनेक बेकायदेशीर आर्थिक व्यवहार झाले आहेत. तपास सुरू असलेल्या व्यक्तींच्या गैरव्यवहार सामील आहात.त्याचा व्हीडीओ उपलब्ध आहे. असे सांगून पोलीस अधिकारी, सीबीआय अधिकारी यांचे बनावट ओळखपत्र पाठवून घाबरवण्याचा प्रकार काही मंडळी करतात. प्रत्यक्ष अटक न करता, डिजीटल अरेस्ट करीत असल्याची धमकी देतात. त्यामुळे कोट्यावधी रुपयांची लुट केली जाते. परंतु हा डिजीटल अरेस्टचा प्रकार शंभर टक्के खोटा आहे. असे कोकणचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी सांगितले आहे. कोणीही याच्या आहारी जाऊ नये आवाहनदेखील त्यांनी केले.

# चौक ग्रामीण रुग्णालयाच्या वतीन मुलांची तपासणी

**। रसायनी । वार्ताहर ।**

ग्रामीण रुग्णालय चौक येथे राष्ट्रीय बाल स्वस्थ कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वयोगटातील अंगणवाडी व शाळेतील विद्यार्थी यांची आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते, त्याला लहान मुलांचा प्रतिसाद मिळाला.



या आरोग्य शिबिरामध्ये प्रमुख खोपोली येथील प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ.प्रमोद वानखेडे व ग्रामीण रूग्णालय चौक ता.खालापूर येथील वैद्यकिय अधीक्षक व बालरोग तज्ञ डॉ. सविता कालेल यांच्याद्वारे रुग्णाची आरोग्य तपासणी करून औषध उपचार करण्यात आले.

तपासणी दरम्यान लहान मुलांची आरोग्य तपासणी,डोळे, दातांची तपासणी,रक्त तपासणी करण्यात आली.यावेळी तपासणी साठी आलेल्या रुग्णांना कैलाश सोनार यांच्याकडून फळेवाटप करण्यात आले. शिबिरामध्ये बालरोग तज्ञांनी आरोग्य, व्यक्तिगत स्वछता, आहार या सर्व विषयी तसेच शासकीय कार्यक्रमाविषयी व रुग्णालयातील उपलब्ध सुविधा बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# नेरळ नळपाणी योजनेचे जलवाहिनी टाकण्याच्या कामास सुरुवात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायत साठी नवीन प्रादेशिक नळपाणी योजना मंजूर झाली आहे.या नळपाणी योजनेसाठी नव्या मार्गाने मुख्य जलवाहिनी टाकण्यात येत आहे. नव्या मार्गामुळे नेरळ नळपाणी योजनेच्या मुख्य जलकुंभात थेट पाणी पोहचवण्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे प्रयत्न सुरु आहेत. दरम्यान, नेरळ नळपाणी योजना योजनेच्या मुख्य जलवाहिनी टाकण्याचे काम देण्यात आले असून मे २०२५ पर्यंत पूर्ण होऊन कार्यान्वित होण्याची शक्यता दिसून येत आहे.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीसाठी महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा विभागाने प्रादेशिक नळपाणी मंजूर केली आहे.त्या पाणी योजनेचे भूमिपूजन २०२३ मध्ये झाले आहे.मात्र मागील दीड वर्षात नळपाणी योजनेचे काम पुढे सरकले नव्हते. परंतु शासनाकडे या नळपणी योजनेचे बजेट वाढवून देण्याबाबत प्रयत्न सुरु आहेत. आणि त्यानंतर नेरळ नळपाणी योजनाईचे रखडलेले काम सुरु झाले असल्याची चर्चा नेरळ गावात सुरु आहे. मे २०२३ मध्ये नेरळ नळपाणी हि ४० कोटींची होती आणि आता हि नळपाणी योजना ४० कोटींचं पुढे गेली असल्याचे बोलले जात आहे.मात्र शासनाकडे हा प्रस्ताव मंजूर झाला किंवा नाही याबाबत नेरळकरांना कोणतीही माहिती नाही. परंतु मागील दीड वर्षे नेरळ गावातील लोकांच्या तोंडाचे पाणी कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने नळपाणी योजना पूर्ण कधी होणार?असा प्रश्न कायम सतावत आहेत.

काही दिवसानापासून नेरळ योजनेचेच्या मुख्य जलवाहिनी टाकण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. मुख्य जलकुंभ येथे पाडा भागातून जलवाहिनी जात होती. नव्या नळपाणी योजनेच्या जल;शुद्धीकरण केंद्र येथून मुख्य जलकुंभ येथे जाणारी हि आता कर्जत कल्याण राज्यमार्ग येथून टाकण्यात येत आहे.त्याचा फायदा हा मुख्य जलकुंभ येथे पाणी थेट पोहचण्यास अडचणी दूर होणार आहेत.

**निवडक**

## स्वीफ्ट डिझायरची चोरी

**पनवेल :** शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या ग्राऊंड लगत असलेल्या कंपाऊंडजवळ उभी करून ठेवलेली सफेद रंगाची स्वीफ्ट डिझायर गाडी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. सोपान चौधरी यांची ९० हजार रु. किंमतीची गाडी (एमएच-०१-सीजे-०८९३) एका ठिकाणी उभी करून ठेवली होती. यावेळी तेथे कोणी नसल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी ती चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पनवेलमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या इसमाचे अंदाजे वय ४५ वर्षे, डोक्याचे केस काळे, दाढी मिशी नॉर्मल वाढलेली व काळी बांधा सडपातळ, उंची अंदाजे ५ फुट २ इंच आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांझुर्णे यांच्याशी संपर्क साधावा.

## ट्रेलरला टँकरची धडक

**पनवेल :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर भगत वाडी सुकापूर जवळ एक ट्रेलर उभा होता. यावेळी मुंबईकडे जाणाऱ्या दुध टँकरवरील चालक सागर खोत याला हा उभा ट्रेलर अचानक समोर उभा दिसल्यामुळे त्याचा वाहनावरील ताबा सुटून थांबलेल्या ट्रेलरला पाठीमागून जोरदार धडकला. या अपघातात चालक सागर खोत, तसेच रंजीत सुर्यवंशी, शिवतेज पाटील व अवधूत सव्वाशे हे जखमी झाले आहेत. या जखमींना कामोठे येथील एम.जी.एम. रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## भव्य मोर्चाचे आयोजन

**महाड :** परभणी येथील घडलेली घटना आणि अमित शहा यांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत केलेले वक्तव्य यांचा निषेध करण्यासाठी मंगळवारी (दि.२४) महाडमध्ये बौध्द समाजाच्यावतीने भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात महाड तालुका बौध्द समाजाच्या नेत्यांची गुरुवारी (दि.१९) चवदार तळे येथील आंबेडकर सभागृहात बैठक संपन्न झाली. हा मोर्चा मुख्य बाजारपेठमार्गे प्रांताधिकारी कार्यालयावर जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## संशयित आरोपी फरार

**पनवेल :** काही दिवसांपूर्वी खारघर पोलीसांनी नायजेरियन नागरिकांकडून अमली पदार्थाचा मोठा साठा जप्त केला होता. यातील रांजणपाडा गावात राहणाऱ्या ५६ वर्षीय संशयिताने नायजेरीयन व्यक्तीला भाड्याने घर देण्यापूर्वी पोलिसांना कळविले नव्हते. त्यामुळे या व्यक्तीला अटकेची कारवाईसाठी खारघर पोलीस ठाण्यात आणले होते. दरम्यान, हा संशयीत खारघर पोलीस ठाण्यातून फरार झाला आहे. याबाबत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची सहाय्यक पोलीस आयुक्तांमार्फत चौकशी सुरू आहे.

# घारापुरीतील राष्ट्रीय ठेव्याची दैन्यावस्था

## नौदलाचे अक्षम्य दुर्लक्ष; पर्यटकांची संख्या रोडावली

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
**घारापुरी बेटावरील ऐतिहासिक तोफा आणि परिसर दुर्लक्षित राहिला आहे. नौदलाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे राष्ट्रीय ठेव्याची पार दैन्यावस्था झाली आहे. यामुळे हा ऐतिहासिक ठेवा अडगळीत पडल्याने देशी-विदेशी पर्यटकांतुन नाराजी व्यक्त केली जात आहे. तसेच, या तोफा पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या देखील रोडावली असल्याचे येथील नागरीकांनी सांगितले आहे.**



ऐतिहासिक घारापुरी लेण्यांना ‘वर्ल्ड हेरिटेज’ दर्जा प्राप्त झाला आहे. या लेण्यांपासुन अवघ्या ५०० मीटर अंतरावर डोंगर माथ्यावर दोन ऐतिहासिक पोलादी तोफा आहेत. ब्रिटिशकाळात मुंबई बंदराच्या संरक्षणासाठी सुमारे २० फुट लांबीच्या या दोन तोफा डोंगरमाथ्यावर बसविण्यात आल्या होत्या. या ऐतिहासिक महत्त्व असलेल्या व देशी-विदेशी पर्यटकांसाठी आकर्षण असलेल्या तोफा पाहाण्यासाठी नेहमीच हजारो पर्यटकांची गर्दी असायची. परंतु, नौदलाच्या अखत्यारीत असलेल्या या तोफा आणि परिसराची दैना उडाली आहे. तसेच, या ऐतिहासिक तोफांकडे जाण्यासाठी लेण्यांकडून जाणारा एकमेव पायवाटेचा रस्ता असून या पायवाटेवरअसलेल्या पायऱ्यांची पार दुर्दशा झाली आहे. या तुटलेल्या पायऱ्यांवरून चालताना तोल जाऊन पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

> तोफा आणि परिसराची जागा नौदलाच्या अखत्यारीत आहे. त्यामुळे त्याकडे पुरातन विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. पुरातन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून नौदलाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन माहिती दिली जाते. मात्र, नौदलाकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे.
> – कैलास शिंदे, घारापुरी लेणी केअर टेकर

तसेच, या पायवाटेवर मोठी दगडं आणि झाडे कोसळल्याने रस्ता बंद झाला आहे. त्यामुळे पर्यटकांना तोफा पाहाण्यासाठी जाताना मोठी कसरत करावी लागत आहे. पुढे असलेल्या २० फुट लांबीच्या भुयारी पादचारी मार्गात देखील प्रचंड अस्वच्छता पसरली आहे. तोफांच्या तळावरील अवशेष गंजून गेले आहेत. तोफांच्या आजुबाजुला प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या पडल्याने अस्वच्छतेचे वातावरण पसरले आहे. डोंगरमाथ्यावरील ऐतिहासिक ठेवा अशा प्रकारे अडगळीत पडल्याने आणि अनेक अडथळ्यांमुळे पर्यटकही तोफा पाहाण्यासाठी फारसे फिरकत नसल्याची खंत स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

> जागा-जमिनीचे काम असल्यावरच नौदलाचे अधिकारी वर्ष दिडवर्षांनी बेटावर हजेरी लावतात. त्यावेळी बेटावरील दुर्लक्षित ऐतिहासिक तोफा व परिसराची माहिती दिली जाते. मात्र, नौदल अधिकारी त्याकडे कायम कानाडोळा करीत आहेत.
> – बळीराम ठाकूर, उपसरपंच



# ठाकरे गटाच्यावतीने उरणमध्ये निषेध

**। उरण । वार्ताहर ।**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर संसदेत केलेल्या आक्षेपार्ह विधानाबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा निषेधार्थ शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्यावतीने शुक्रवारी (दि.२०) रायगड जिल्हाप्रमुख मा.आ. मनोहर भोईर यांच्या नेतृत्वाखाली उरणमध्ये काळे झेंडे दाखवून जोरदार निदर्शने करण्यात आली.

यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरुद्ध जोरदार घोषणाबाजी करून त्यांच्या राजीनामाची मागणी देखील करण्यात आली. यावेळी उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, गणेश शिंदे, विनोद म्हात्रे, कैलास पाटील, नगरसेवक समीर मुकरी, महेंद्र पाटील, जगजीवन नाईक, आशिष गोवारी, वंदना पवार, रंजना तांडेल, रविंद्र पाटील, पाटील, गुलजार भाटकर, रवींद्र भोईर, मेघशाम कडू, आयुब मीर, योगेश गोवारी, इस्माईल शेख, फतेह खान, निलेश म्हात्रे व कार्यकर्ते उपस्थित होते.

# माथेरानमधील हिरकणी कक्षाला टाळे

## मुख्याधिकारी यांचे दुर्लक्ष; महिला पर्यटकांची प्रचंड गैरसोय

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
माथेरान शहराचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी येथे प्रवासी संकलन केंद्राच्या बाजूला महिला पर्यटकांना आपल्या बाळाला स्तनपान करता यावे यासाठी हिरकणी कक्ष निर्माण केले आहे. याच हिरकणी कक्षाला टाळे लागले असून महिला पर्यटकांची गैरसोय होत आहे. दरम्यान, या हिरकणी कक्षाच्या बाजूने माथेरान पालिकेचे मुख्याधिकारी माथेरान शहरात येत-जात असतात आणि तरी देखील त्यांचे हिरकणी कक्षाकडे दुर्लक्ष होत आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, शहरातील नागरिक जनार्दन पारटे यांनी त्याबाबत रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी निवेदन देत आवाज उठविला आहे.




माथेरान या ठिकाणी दरवर्षी साधारण १४-१५ लाख पर्यटक येत असतात. त्यात महिला पर्यटकांची संख्या देखील काही मोठ्या प्रमाणात असते. आपल्या लहान मुलांना घेऊन येणाऱ्या महिला पर्यटकांची संख्या लक्षात घेऊन तत्कालीन मुख्याधिकारी सुवर्णा भणगे यांनी हिरकणी कक्षाची निर्मिती केली होती. हिरकणी कक्षात महिलांना आपल्या बाळाला स्तनपान करण्यासाठी एकांत मिळावी हा त्यांचा प्रयत्न होता. मात्र, त्याच हिरकणी कक्षाला गेली वर्षभर टाळे लागले आहे. हा हिरकणी कक्ष बंद असल्याने महिला पर्यटकांची चांगलीच गैरसोय होत आहे.

माथेरानमध्ये आलेल्या प्रवासी पर्यटक महिला हिरकणी कक्षाला टाळे लावलेले पाहून नाराजी व्यक्त करीत आहेत. याचबरोबर स्थानिक देखील नाराजी व्यक्त करीत आहेत.

## सुंदरीबाई कवाडे यांचे निधन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
श्रीवर्धन तालुक्यातील दांडगुरी येथील सुंदरीबाई बाळाजी कवाडे (९४) यांचे बुधवारी (दि.१८) वृध्दापकाळाने निधन झाले आहे. शेकापचे कार्यकर्ते दिनेश कवाडे यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. सुंदरीबाई कवाडे यांची शोकसभा व पुण्यानुमोदनाचा कार्यक्रम रविवारी (दि.२२) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास दांडगूरी येथे त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती कवाडे कुटुंबियांनी दिली आहे.

# पीएनपी कॉलेजचे एनएसएस शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यातील वेश्वी येथील पीएनपीच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबीर नुकतेच राम राज येथे पार पडले. या शिबिराचा उद्‌घाटन सोहळा संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या उपस्थितीत पार पडला आहे.


(छायाचित्र- अमोल नाईक)

यावेळी माजी पंचायत समिति सदस्य सुभाष वागळे, अशोक खोत, यशवंत भगत, माजी सरपंच मोहन धुमाळ, माजी उपसरपंच जयेश ढेबे, माजी सदस्य धर्मेश गडखळ, माजी सरपंच मधु ढेबे, बाळू पाटील तसेच कॉलेजचे संचालक विक्रांत वार्डे, प्राचार्य रविंद्र पाटील, शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

सात दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन रामराज येथील खैरवाडीत करण्यात आले होते. या शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी प्राथमिक शाळा, अंगणवाडी व क्रीडांगण स्वच्छता अभियान राबवले. तसेच, शून्य कचरा व्यवस्थापन कार्यशाळा, एचआयव्ही जनजागृती तसेच महिलांकरिता मासिक पाळी व्यवस्थापन जनजागृती अभियान राबविण्यात आले. यादरम्यान, श्रमदानातून ‘पाणी आडवा पाणी जिरवा’ अंतर्गत उंच बंधारा बांधण्यात आला. शिबीर यशस्वी पार पाडण्यासाठी कॉलेजचे प्राचार्य रविंद्र पाटील तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. गणेश पाटील, प्रा. प्रियांका पाटील व इतर शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली.



● पनवेल महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने नवीन पनवेलच्या आदई सर्कल येथील फूटपाथ वरील अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या दुकानांवर सकाळच्या सुमारास बुलडोझर लावून कारवाई करण्यात आली. यादरम्यान परिसरात तणावपूर्ण वातावर निर्माण झाल्यामुळे खांदेश्वर पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता. पालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थित होते. फूटपाथ मोकळा करण्यात आला आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

# अमित शहांचा पनवेलमध्ये निषेध

**। पनवेल । वार्ताहर ।**
भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी गृहमंत्री अमित शहा यांच्या बेताल वक्तव्याचा पनवेलमध्ये महाविकास आघाडीतर्फे जाहीर निषेध करण्यात आला.



भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी बेताल वक्तव्य केल्याप्रकरणी गृहमंत्री अमित शहा यांचा पनवेलमध्ये मविआकडून जाहीर निषेध करण्यात आला आहे. यावेळी शेकापचे मा.आ.बाळाराम पाटील, पनवेल शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, समाजवादी पार्टी जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, नरेंद्र गायकवाड, शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे प्रवीण जाधव, यतीन देशमुख, सदानंद शिर्के, संतोष गोळे, काँग्रेस तालुकाध्यक्ष नंदराज मुंगाजी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, काशिनाथ पाटील, गणेश कडू, शंकर म्हात्रे, निर्मला म्हात्रे, नरेंद्र गायकवाड, अनिल ढवळे, बबन गोगावले, गणेश खांडगे, संगीता राऊत, शशिकांत बांदोडकर, पराग मोहिते, राज सदावर्ते, राकेश जाधव, सुभाष गायकवाड, शशिकांत वाघमारे आदींसह मोठ्या प्रमाणात मविआचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## मांडवा बंदर पोलीस इमारतीला

# जाहिरातींचा विळखा

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**
**मुंबईतील २६/११ च्या हल्ल्यानंतर सागरी सुरक्षा मजबूत करण्यासाठी मांडवा बंदरावर संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी दुमजली इमारत उभारण्यत आली आहे. परंतु, या इमारतीला खासगी कंपन्यांच्या जाहिरातीने विळखा घातला आहे. तसेच, या इमारतीच्या वरती काही कंपन्यांचे टॉवरही आहे. परंतु, हे टॉवर जीर्ण अवस्थेत असून कधीही कोसळून प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आल्याची प्रतिक्रीया उमटत आहे.**

मुंबईमध्ये २६ नोव्हेंबर २००८ मध्ये झालेला दहशतवादी हल्ला हा सागरी मार्गानेच करण्यात आला होता. त्यानंतर सागरी किनाऱ्यांवरील सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी तसेच, पोलीसांचा बंदोबस्त वाढविण्याबरोबरच वेगवेगळी सुरक्षेसाठी पावले उचलण्यात आली होती. यातच रायगड पोलीस कार्यक्षेत्रातील मांडवा बंदर ते गेटवे जल मार्गाने प्रवास करणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. लाखो प्रवासी या मार्गाने प्रवास करत असतात. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मांडवा बंदरावरच संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी सुसज्ज अशी इमारत बांधण्यात आली होती. तत्कालीन विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. सुखविंदर सिंह, पोलीस अधीक्षक अंकुश शिंदे यांच्या उपस्थितीत १४ मार्च २०१३ मध्ये या इमारतीचे उद्‌घाटन करण्यात आले होते.

मांडवा जेटीवर प्रवासी बोटीने येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांसह त्यांच्याकडे असलेल्या सामानांची तपासणी करण्यासाठी त्या ठिकाणी यंत्र बसविण्यात आले आहे. परंतु, गेल्या काही वर्षापासून या इमारतीला वेगवेगळ्या खासगी कंपन्यांच्या जाहीरातींचे लोखंडी फलक लावण्यात आले आहेत. याच इमारतीच्यावरती मोबाईल टॉवरदेखील आहेत. या वॉच टॉवरची अवस्था बिकट झाली असून जाहीरातीच्या लोखंडी फलकदेखील वाकडे झाले असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत. पोलिसांच्या या इमारतीला खासगी कंपन्यांनी विळखा घातला असताना त्याकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.




या इमारतीला सायबर गुन्हेगारीबाबत जनजागृतीचे फलक लावल्यास जलमार्गाने येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांमध्ये जनजागृती होऊ शकते,अशी प्रतिक्रिया प्रवासी वर्गाकडून उमटत आहे.

> इमारतीची मालकी अजूनही एमएमबीकडे आहे. परंतु, या इमारतीवर असलेल्या जाहिरातींच्या फलकांबाबत सुरक्षेच्या दृष्टीने कारवाई करण्याबाबत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.
> – दीपक भोय,
> सहाय्यक पोलीस निरीक्षक,
> मांडवा सागरी पोलीस.



# सागरी अपघातानंतर

मुंबईच्या समुद्रात बुधवारी झालेला अपघात अत्यंत दुर्दैवी आहेच, पण या परिसरातील सागरी वाहतुकीतही आता नियमनाची गरज आहे हे दर्शवणारा आहे. अपघात झाला तो नेव्हीच्या स्पीडबोटीमुळे. या स्पीडबोटीची चाचणी चालू होती. तिच्यात काही बिघाड झाला की, चालकाचे नियंत्रण सुटले याचा नीट तपास होईलच. मुंबईच्या लगत १४९ किलोमीटरच्या समुद्रात सोळा विविध ठिकाणी प्रवासी वाहतूक चालते. फार पूर्वीच्या काळापासून भाऊच्या धक्क्यावरून कोकणात वाहतूक चाले. नंतर गेटवे ऑफ इंडियापासून वाहतूक सुरू झाली. रायगड जिल्ह्यासाठी तर ही वाहतूक एक वरदान ठरली आहे. यात पारंपरिक लाकडी बोटी आणि आधुनिक कॅटमरान या दोन्ही वापरल्या जातात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय बंदर असल्याने आणि, नौदलाचेही महत्वाचे केंद्र असल्याने या भागात त्यांच्या बोटी व नौकांचीही मोठी वर्दळ असते. सध्या मासेमारीसाठीच्या साडेतीनशे आणि पर्यटन व प्रवासी वाहतुकीसाठीच्या सुमारे तीनशे अशा एकूण ७५५ नौका या समुद्रात वावरत असतात. एलिफंटा आणि मांडवा येथे ये-जा करणाऱ्या सुमारे ऐंशी लाकडी बोटी असून दर दिवशी सरासरी दोन हजार प्रवासी त्यांनी प्रवास करतात. गोवा, केरळ, तमिळनाडू, बंगाल अशा राज्यांमध्येही स्थानिक पातळीवर लाकडी बोटींचा वापर होत असतो. आंध्र प्रदेशात गोदावरीमध्ये किंवा आसामात ब्रह्मपुत्रेमध्येही जलवाहतूक चालते. किंबहुना, भारतातच नव्हे तर जगभरात सर्वत्र अजूनही बोटींची वाहतूक होत असते. दुर्दैवाने बुधवारच्या अपघातात बोट फुटून त्यातले प्रवासी मृत्यूमुखी पडले. त्यामुळे जनतेच्या चिंतेचा आणि टीकेचा सर्व रोख प्रवासी वाहतूक करणाऱ्या बोटींकडे वळली आहे. वास्तविक या बोटी लोकांची मोठी गरज भागवत असतात व स्वस्त वाहतूक पुरवत असतात. ही वाहतूक करणारे सर्वच व्यावसायिक हे अनुभवी व जबाबदारीने वागणारे आहेत. वर्षानुवर्षे येथे वावरल्याने समुद्राचीही त्यांना चांगली ओळख आहे. ते कधीही अवाजवी जोखीम घेत नाहीत.

### नौदलाने काळजी घ्यावी

बुधवारच्या अपघातानंतर जीवरक्षक जाकिटे घालण्याचा मुद्दा पुढे आला आहे. अशी जाकिटे बोटींवर असली पाहिजेत व प्रत्येक वेळी प्रवाशांनी ती घातली पाहिजेत हा नियम म्हणून योग्यच आहे. पण यातील वस्तुस्थितीही लक्षात घ्यायला हवी. स्कूटरवर हेल्मेट घालणे हे उपकारक ठरते हे ठाऊक असूनही बहुसंख्य शहरांमध्ये बहुतेक लोक ते घालत नाहीत. याचे कारण मुळात ते ज्या रस्त्यांवर गाड्या चालवतात तेथे प्रचंड वाहतुकीमुळे दुचाकींचा वेग फार नसतो. शिवाय, बहुतांश लोक अगदी छोट्या अंतरांचे प्रवास करीत असतात. मुंबईनजीकच्या वाहतुकीबाबतही काहीसे हेच वास्तव आहे. येथील बोटींचा वेग मर्यादित आहे. समुद्र व हवामान ओळखीचे आहे. अचानक वादळ इत्यादी येण्याची शक्यता कमी आहे. शिवाय, आतापर्यंत तरी बोटींची गर्दी नसल्याने टकरी होणे असे प्रकार घडत नव्हते. बुधवारच्या अपघातानंतर असेही घडू शकते याची जाणीव सर्वांना करून दिली आहे. मुंबईच्या किनाऱ्यानजीक इतक्या वर्दळीच्या भागात नौदलाने आपल्या बोटींच्या चाचण्या करू नयेत अशी एलिफंटाला जाणाऱ्या बोटचालकांची जुनी मागणी आहे. मेरीटाईम बोर्डाच्या प्रतिनिधींनाही या अडचणींची कल्पना आहे. मात्र त्याकडे म्हणावे तसे लक्ष दिले गेले नव्हते. आता त्याचा विचार करावा लागेल. बुचर आयलंड, कारंजा इत्यादी परिसरात नौदलाच्या व इतर भारी वजनी बोटी प्रवासी वाहतूक करणाऱ्यांच्या मार्गात येतात, तसेच त्या खूप जवळून जात असल्याने लाटा उसळून प्रवासी बोटींना समतोल राखणे कठीण होते अशा प्रकारच्या तक्रारी यापूर्वी केल्या जात होत्या. आता त्यांचा अधिक गंभीरपणे विचार होईल अशी अपेक्षा आहे. जीवरक्षक जाकिटे बहुतांश बोटींवर असतातच. मात्र प्रवासाचा वेळ इतका कमी असतो की त्यात ती चढवणे व उतरवणे यांचा लोक कंटाळा करतात. शिवाय, मुंबई परिसर कायमच उष्ण व दमट असल्याने ही जाकिटे चढवून प्रवास करणे अनेकांना गैरसोयीचे वाटते. मात्र आता ही गैरसोय सोसावी लागेल असे दिसते.

### जबाबदारी झटकू नका

आपल्याकडे एखादी दुर्घटना घडल्यानंतरच जनता तसेच प्रशासनाला जाग येत असते. त्यातही प्रशासनाचे उपाय हे आपल्यावर भविष्यात दोष येऊ नये अशा प्रकारचे किंवा जबाबदारी झटकणारे असतात. त्यात लोकांची सोय-गैरसोय पाहिली जात नाही. किंवा, वेगळा सोयीचा मार्ग काढण्याचा विचार होत नाही. मागे मुंबईत ११ जुलै २००६ रोजी लोकल गाड्यांमध्ये जे बॉंबस्फोट झाले होते त्यावेळी सामान ठेवण्यासाठीच्या रॅकवर बॅगांमध्ये हे बॉंब ठेवण्यात आले होते. हे लक्षात येताच सरकारने या रॅक काढून टाकण्याचा निर्णय घेतला. तो मूर्खपणाचा होता. कारण मुंबई लोकलमधून लोक दोन-तीन तास भीषण गर्दीत प्रवास करतात. रॅक काढून टाकल्यामुळे सामानासह उभे राहून असा प्रवास करणे हे भयंकर त्रासाचे होते. मात्र प्रशासनातील अधिकारी वा छगन भुजबळांसारखे मंत्री यापैकी कोणालाच लोकलमधून प्रवास करायचा नसल्याने त्यांनी धाडकन निर्णय घेऊन टाकला. जणू बॉंबस्फोट घडवणारे दरवेळी लोकलमधील रॅकवरच सामान ठेवणार होते. असाच काहीसा प्रकार या अपघातानंतर होण्याची शक्यता दिसते आहे. प्रशासन आपल्यावरची जबाबदारी टाळण्यासाठी प्रवासी संख्येवर निर्बंध आणणे, लाकडी बोटींविरुध्द कारवाया करणे असे काही मार्ग अवलंबण्याची शक्यता आहे. प्रवाशांची सुरक्षितता पाहिली पाहिजेच. त्यात कुचराई करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. कारण त्यांच्यामुळे इतर व्यावसायिक विनाकारण बदनाम होत असतात. पण हे करताना प्रशासनाने तारतम्यही बाळगायला हवे. बोटींचे चालक, मेरीटाईम बोर्ड, नौदल व इतर संबंधित अधिकारी यांनी एकत्रित बसून सर्वांच्या भल्याचा निर्णय घ्यायला हवा. अन्यथा, लोकांच्या समाधानासाठी चार दिवस काही नियम केले जातील व नंतर पुन्हा येरे माझ्या मागल्या होऊन पुढील अपघात होईपर्यंत सर्व काही शांत होईल. तसे होऊ नये. समुद्रातील वाहतुकीला मुंबईच्या रस्त्यांवरच्या वाहतुकीची अवकळा येऊ नये व प्रवासी व पर्यटक यांना आनंदाने प्रवास करता यावा हीच सर्वांची इच्छा आहे.

विचार

# संत गाडगेबाबा म्हणजे महाराष्ट्राचा सॉक्रेटिस!

**संत गाडगेबाबा यांनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, अस्पृश्यता, भेदाभेद या अनिष्ट प्रथा परंपराविरोधात लहानपणापासूनच लढा देण्यास सुरुवात केली होती. धर्माच्या नावाखाली चाललेले शोषण त्यांना कधीच मान्य नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव त्यांनी अनेक कीर्तनातून केला. सोन्या-चांदीच्या दागिन्यापेक्षा शिक्षण महत्त्वाचे आहे. शिक्षण हाच महत्त्वाचा दागिना आहे. त्यासाठी मुलांना शाळेत पाठवा, असे आवाहन त्यांनी केले.**

**डॉ. श्रीमंत कोकाटे**

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शेनगाव या गावी झाला. त्यांचे मूळ नाव डेबुजी झिंगराजी जानोरकर असे होते. ते लहान असताना त्यांचे वडील वारले. आई सखुबाई यांनी त्यांना मामाच्या गावी घेऊन आल्या व आई आणि मामाच्या छत्रछायेखाली त्यांची जडणघडण झाली. बालपणापासूनच ते अत्यंत बंडखोर होते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड, अस्पृश्यता, भेदाभेद या अनिष्ट प्रथा परंपरा त्यांना मान्य नव्हत्या. त्याविरुद्ध ते बालपणापासूनच लढत होते. धर्माच्या नावाखाली चाललेले शोषण त्यांना मान्य नव्हते ,त्याविरुद्ध ते लढले. गरिबांना मदत करणे, कोणी आजारी असेल तर त्याला औषध उपचार करणे, निराधार व्यक्तींना आधार देणे, ही बालपणापासूनच त्यांची वृत्ती होती. त्यांचा विवाह झाला. त्यांना चार मुली आणि एक मुलगा होता.

ऐन तारुण्यांमध्ये डेबुजी यांनी गृहत्याग केला. समाज परिवर्तनाच्या उद्देशाने त्यांनी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात पादाक्रांत केला. त्यांनी गावोगावी जाऊन समाज प्रबोधन केले. त्यांची मांडणी अत्यंत साध्या सोप्या लोकभाषेत होती. त्यांची पद्धत लोककल्याणकारी होती. गावात जायचे, हातातील खराट्याने प्रथमता गाव स्वच्छ करायचे आणि त्यानंतर त्याच गावात संध्याकाळी कीर्तन करायचे. कीर्तनातून ते शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यायचे. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव त्यांनी अनेक कीर्तनातून केला. ते जनतेला सांगायचे सोन्या-चांदीच्या दागिन्यापेक्षा शिक्षण महत्त्वाचे आहे. शिक्षण हाच सगळ्यात महत्त्वाचा दागिना आहे. त्यासाठी मुलांना शाळेत पाठवा. शिक्षणासाठी मदत करा, असेच एकदा त्यांचे शिष्य बंडो गोपाळा मुकादम(कदम) हे गाडगेबाबांना एक लाख रुपये देणगी देण्यासाठी पंढरपूरला गेले, तेव्हा गाडगेबाबा त्यांना म्हणाले ''हे पैसे तुम्ही कर्मवीर भाऊराव पाटलांच्या शाळेसाठी द्या'' पुढे बंडू गोपाळा मुकादम यांनी आपल्या गावात शाळा सुरू केली. रयत शिक्षण संस्थेला भरघोस मदत केली. ते पुढे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले. गाडगेबाबांच्या कार्याचे स्मरण म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी कराड या ठिकाणी सद्गुरु गाडगेबाबा महाविद्यालय सुरू केले. मुंबई प्रांताचे तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी आकसाने रयत शिक्षण संस्थेचे अनुदान बंद केले, तेव्हा गाडगेबाबा स्वतः मंत्रालयात गेले आणि बाळासाहेब खेळांना निक्षून सांगितले की रयत शिक्षण संस्थेचे अनुदान सुरू करा. त्यांनी तत्काळ अनुदान सुरू केले, इतका नैतिक दबदबा गाडगेबाबांचा शासन व्यवस्थेवरती होता.

संत गाडगेबाबा यांनी भाविकांसाठी आणि रुग्णांसाठी अनेक शहरांमध्ये धर्मशाळा सुरू केल्या. त्यामध्ये पंढरपूर, पुणे, देहू, आळंदी, नाशिक, मुंबई इत्यादी शहरांचा समावेश आहे. मुंबई या ठिकाणी दवाखान्यासाठी येणाऱ्या रुग्णांना राहण्याची सोय व्हावी यासाठी धर्मशाळा सुरू केली. गाडगेबाबा नियमित पंढरपूरला जात असत आणि तेथे जाऊन सांगत ''देव दगडात नाही माणसात आहे.'' पंढरीच्या पांडुरंगाचे ते नितांत भक्त होते, परंतु ते अंधभक्त कधीही नव्हते. त्यांनी वारकरी संप्रदायाचा जो प्रगतिक विचार आहे तो कीर्तनातून मांडला. त्यांची पद्धत अत्यंत सोपी होती. ते कीर्तनातून श्रोत्यांना बोलके करायचे. तेच श्रोत्यांना प्रश्न विचारायचे आणि श्रोत्यांना उत्तर द्यायला भाग पाडायचे. आपण अज्ञान आहोत, आपण भोळे आहोत, असे भासवायचे आणि जनमानसातील वैचारिक चैतन्य ते जागृत करायचे.



हीच पद्धत ग्रीक तत्त्वेता सॉक्रेटिस यांची होती. सॉक्रेटिसदेखील अत्यंत साधा, सरळ, प्रांजळ पण तितकाच संवेदनशील आणि महाबुद्धिमान तत्त्वेता होता. तशाच पद्धतीचे महाराष्ट्राला लाभलेले व्यक्तिमत्व म्हणजे गाडगेबाबा आहेत. गाडगेबाबा म्हणजे महाराष्ट्राचा सॉक्रेटिस आहे.

संत गाडगेबाबा हे कोणत्याही विद्यापीठाचे पदवीधर नव्हते, परंतु आज अमरावती या ठिकाणच्या विद्यापीठाला ''संत गाडगेबाबा विद्यापीठ'' असे नाव देण्यात आले आहे. गाडगेबाबा महाराष्ट्राचे चालते विद्यापीठ होते. ते सांगायचे की देव दगडात नाही, देव माणसात आहे. माणसांची सेवा हाच खरा परमार्थ आहे. अस्पृश्यता पळू नका, गरिबांना मदत करा, रुग्णांना औषध-उपचार द्या. तहानलेल्याना पाणी द्या, भुकेलेल्या अन्न द्या, गरिबांना शिक्षण द्या, निराश्रितांना आश्रय द्या, बेरोजगारांना रोजगार द्या, मुक्या प्राण्यांना अभय द्या, गरीब तरुण-तरुणींचे लग्न लावून द्या, असे त्यांचे साधे सोपे तत्त्वज्ञान होते. त्यांना लाखो लोकांनी कोट्यावधी रुपये दिले, परंतु तो पैसा त्यांनी स्वतःच्या किंवा मुलांच्या नावावर कधी केला नाही, तर लोककल्याणासाठी त्यातील पै ना पै वापरला. घेणारे हात स्वच्छ असतील तर देणारे कोट्यावधी हात पुढे येतात. गाडगेबाबा स्वच्छ हाताचे, स्वच्छ मनाचे महापुरुष होते. त्यांना कोणी पाचीपक्वानाचे जेवण दिले तर ते गरिबांना द्यायचे व गरीबाची चटणी भाकरी आनंदाने खायचे. असा हे महायोगी आधुनिक भारताचे वैभवशाली आणि अभिमानास्पद संत आहेत.

संत गाडगेबाबा यांनी संत तुकाराम महाराजांचा विचार लोकभाषेमध्ये सांगितला. संत गाडगेबाबा म्हणायचे ''मी कोणाचाही गुरु नाही आणि मला कोणीही शिष्य नाही'' यातून त्यांचा निस्पृहपणा स्पष्टपणे दिसतो. अतिव कर्तृत्वातून येणारा अहंकार त्यांच्या ठायी नव्हता किंवा सर्वसामान्यांना दुय्यम लेखण्याची त्यांची वृत्ती नव्हती. म्हणूनच ते इतक्या प्रांजळपणे म्हणू शकले की मी कोणाचा गुरु नाही आणि मला कोणीही शिष्य नाही, परंतु ते महाराष्ट्राचे लोकविद्यापीठ होते, एवढे मात्र निश्चित! संत गाडगेबाबा परखड होते, तितकेच ते प्रेमळ होते. ते सडेतोड होते, तितकेच ते संवेदनशील होते. ते नि:स्वार्थी होते, त्यांचा स्वार्थ एवढाच होता की लोककल्याणासाठी सर्वस्व समर्पित करणे.

हातात खराटा, डोक्यावरती फुटके गाडगे, खांद्यावरती गोधडी असा त्यांचा साधा पेहराव असायचा. असेच साधेपणाचे जीवन सॉक्रेटीस जगला, पण जनतेचे कल्याण करून गेला. तसेच गाडगेबाबा होते. ''गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला!'' हे त्यांचे गाजलेले भजन होते. वारकरी संप्रदायाच्या कीर्तनपरंपरेला त्यांनी ऊर्जित केले. मुंबईच्या बांद्रे येथील पोलीस स्टेशनमध्ये झालेले त्यांचे कीर्तन खूप गाजले. त्यांचे आवाजाचे एकमेव रेकॉर्डिंग उपलब्ध आहे. त्यांच्या कार्याचा गौरव आचार्य प्र. के. अत्रे, महात्मा गांधी यांनी मुक्तकंठाने केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गाडगेबाबांच्या प्रति नितांत आदर होता. ते गाडगेबाबांचे कीर्तन ऐकायला आवर्जून जायचे. अशा महापुरुषाचे २० डिसेंबर १९५६ रोजी वयाच्या ७५ व्या वर्षी दु:खद निधन झाले, पण त्यांचे विचार, कार्य आणि तत्त्वज्ञान अजरामर आहे. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

आजकाल

# माहिती अधिकार कायद्याचे धिंडवडे

सरकारच्या गैरकारभाराचे वाभाडे काढण्यासाठी विरोधकांकडून माहिती अधिकाराचा आयुध म्हणून वापर होतो. त्यामुळे सरकारकडून पद्धतशीरपणे या माहिती अधिकाराच्या कायद्याची अडवणूक केली जात असल्याचे दिसून येते. राज्यात सात माहिती आयुक्त आणि एक मुख्य आयुक्त अशी आठ पदे आहेत. यापैकी मुख्य आयुक्त मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती अशा चार विभागांची पदे रिक्त आहेत. तर अन्य चार आयुक्तांकडे अन्य चार विभागांचा प्रभार आहे. मुंबईचे माहिती आयुक्त प्रदीप व्यास यांच्याकडे मुख्य माहिती आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. पुण्याचे आयुक्त मकरंद रानडे यांच्याकडे छत्रपती संभाजीनगर, नाशिकचे आयुक्त भूपेंद्र गुरव यांच्याकडे नागपूर तर, कोकण विभागाचे आयुक्त शेखर चन्ने यांच्याकडे अमरावती विभागाचा प्रभार आहे. राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी आयुक्तांच्या नियुक्तीसाठी जाहिरात काढली होती. मात्र, त्यावर पुढे काहीही झालेले नाही. विभागीय माहिती कार्यालये कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरवशावर आहेत. नियमित नियुक्त्या करून माहिती विभाग भक्कम करण्यात सरकारला रस नाही. त्यामुळे सरकारच्या अनास्थेचा माहिती अधिकाराला फटका बसताना दिसतो



२००५ मध्ये देशभर माहिती अधिकार कायदा लागू करण्यात आला. मात्र, मागील काही वर्षांत माहिती आयुक्तांसह कर्मचाऱ्यांची रिक्त पदे आणि सरकारच्या कमालीच्या दुर्लक्षामुळे हजारो माहितीचे अर्ज प्रलंबित आहेत.

२०१९ पासून राज्यातील विविध माहिती आयुक्तांकडे माहितीसाठीचे हजारो अर्ज आणि अपिले प्रलंबित आहेत. अर्जदाराला माहिती दिल्यास प्रसारमाध्यमांमध्ये वृत्त प्रकाशित होऊन प्रशासकीय यंत्रणेत सुरू असलेल्या गैरप्रकाराचे पितळ उघडे पडते. त्यातून सरकारची बदनामी होऊन प्रतिमेलाही धक्का बसत असल्याने माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली जाते. सत्ताधारी पक्ष सहसा मर्जीतील व्यक्ती किंवा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचीच आयुक्त पदावर नियुक्ती करतो. ते सरकारच्या प्रतिमेला धक्का बसणार नाही याची काळजी घेतात. याशिवाय माहिती विभागीय कार्यालयात कर्मचाऱ्यांची वानवा असल्याने एका दिवसात केवळ चार ते पाच अपिलांवर सुनावणी होते. अनेक प्रकरणांमध्ये अर्जदाराला जाणीवपूर्वक एका दिवसापूर्वी पत्र पाठवून सुनावणीला बोलावले जाते. अशा सगळ्या पळवाटा माहिती अधिकाराच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी ठरताना दिसतात.

माहिती अधिकाराचा अर्ज दाखल झाल्यावर १० दिवसांच्या आत माहितीसाठी भरावयाचे शुल्क अर्जदाराला पत्र पाठवणे आणि ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक आहे. यानंतर अर्जदार पुढच्या ३० दिवसांत अपील करू शकतो. यावर ४५ दिवसांच्या आत सुनावणी होणे आवश्यक आहे. यातही अर्जदाराचे समाधान न झाल्यास तो द्वितीय अपील करू शकतो. मात्र, द्वितीय अपिलावर निर्णय देण्यास वेळेचे बंधन नाही. त्यामुळे माहिती अधिकारी द्वितीय अपील प्रकरणांवर फारसे लक्ष देत नसल्याने हजारो प्रकरणे प्रलंबित राहतात. माजी केंद्रीय माहिती आयुक्त शैलेश गांधी यांनी यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे. द्वितीय अपिलाला कालमर्यादा ठरवावी अशी मागणी करण्यात आली. मात्र, त्यावर अद्यापही अंमलबजावणी झालेली नाही. माहिती अधिकार कायद्याने घालून दिलेल्या कालमर्यादेचे पालन केले जात नसल्याने, आयोगाच्या सप्टेंबर २०२४ च्या मासिक अहवालानुसार द्वितीय अपिलांची संख्या ८२ हजार ३८३ आहे. त्यामध्ये सर्वाधिक २० हजार प्रलंबित अपिले मुख्यालयातील असून नाशिक १२ हजार, पुणे आणि अमरावती प्रत्येकी ११ हजार द्वितीय अपिले प्रलंबित आहेत.

माहिती कार्यालयात कालमर्यादेचे पालन करणे बंधनकारक आहे. शासकीय सेवेतील बहुतांश कर्मचाऱ्यांना याची सवय नसते. त्यामुळे ते माहिती विभागातील नियुक्ती घेण्यास टाळाटाळ करतात. तसेच काही जिल्ह्यांसाठी एक माहिती विभागीय कार्यालय असते. त्यामुळे जिल्ह्याच्या ठिकाणी नोकरीला असणारे कर्मचारी विभागीय कार्यालयात जाऊन सेवा देण्यास नकार देतात. माहिती विभागात बैठे काम असल्याने अन्य भत्ते दिले जात नाहीत. यामुळेही कर्मचारी येथील सेवा घेण्यास नकार देतात. माहिती अधिकार हा एकमेव कायदा जनतेच्या बाजूने आहे. परंतु, मागील चार-पाच वर्षांपासून अनेक अपिले सुनावणीच्या प्रतीक्षेत आहेत. परिणामी माहितीसाठी अपील केलेल्या काही अपिलार्थींचे निधन झाले आहे. आवश्यक माहितीची उपयुक्तता संपल्यामुळे लोकांनीही आपल्या अपिलांवर सुनावणीची आशा सोडून दिली आहे. राज्य सरकारने शासन निर्णय काढूनही शासकीय विभाग संकेतस्थळावर माहिती अद्यायावत करत नाही. त्यामुळे माहिती अधिकाराच्या मूळ उद्देशाला तडा जात आहे.

लोकसंसद

### पुण्यासह सर्वच विमानतळांचे नामकरण लवकर व्हावे

पुणे येथील लोहगाव विमानतळाला जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे नाव देण्याचा ठराव विधानसभेत मंजूर झाला असून त्या ठरावाची शिफारस केंद्र सरकारकडे करण्यात येणार आहे. लोहगाव विमानतळाचे नामकरण 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय



विमानतळ, पुणे' असे होणार आहे ही आनंदाची बातमी आहे. परंतु हे नामकरण लवकरात लवकर व्हावे. कारण या आधीही महाराष्ट्रातील तीन अन्य म्हणजे छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा विमानतळाचे 'छत्रपती संभाजी महाराज विमानतळ', सिंधुदुर्गच्या चिपी विमानतळाचे 'बॅरिस्टर नाथ पै विमानतळ' आणि नवी मुंबईतील प्रस्तावित विमानतळाचे 'दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नामकरण करण्याचे शासकीय ठराव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले असून बराच काळ लोटूनही अद्याप मंजुरीविना ते प्रलंबित आहेत. सुदैवाने पुण्याचेच मुरलीधर मोहोळ केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्रीपदाची धुरा सांभाळत असल्याने पुण्याच्या विमानतळासह या सर्व विमानतळांच्या नामकरणाला गती मिळेल अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

**- प्रदीप मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२१ डिसेंबर**

**१८४९ :-** निबंधकार, समीक्षक हरि माधव पंडित यांचा जन्म. विविध ज्ञानविस्ताराचे संपादक असणाऱ्या पंडितांनी वामनराव मावळकरांच्या सहाय्याने भवभूतीच्या 'श्रीमहवीर चरित्र' या नाटकाचे गद्यपद्यात्मक भाषांतर आणि स्वतंत्रपणे क्षेमेंद्रकृत चंडकौशिक' नाटकाचे भाषांतर केले. तसेच 'श्रीमन्नारायण पेशवे' हे स्वतंत्र नाटक लिहिले. ह्याखेरीज नागपूर भोसल्यांचा इतिहास लिहिला. आनंदीबाई जोशी, ज. ब. मोडक, कृष्णशास्त्री चिपळूणकर, आवदी दादाजी ह्या चार कर्तबगार व्यक्तींची चरित्रे लिहिली. चर्चात्मक, चरित्रात्मक व समीक्षात्मक लेखन त्यांनी विपुल प्रमाणात केले. **१९२८ : -** बालसाहित्यिक माधव मोर्डेकर यांचा जन्म. **१९३५ :-** ख्यातनाम बालसाहित्यिक दत्ता टोळ यांचा जन्म. बालसाहित्याची एकूण ७५ पुस्तके त्यांची प्रकाशित. 'जादू संपली', 'गोड्या पाण्याचे बेट' या कादंबऱ्या. 'शाहू महाराज', 'म. फुले' यांची चरित्रे, 'शाळा नसलेला गाव' ही एकांकिका, 'एक मन एक रुप' हे पुरस्कारप्राप्त पुस्तक याशिवाय प्रौढांसाठी 'मुलगा पाहिजे' ही एकांकिका आणि 'एका वेड्याने एकदा हा कथासंग्रह प्रसिद्ध. **१९३८ :-** 'अंतरिक्ष' या विषयावर लेखन करणाऱ्या लेखिका सुधा वसंत गोवारीकर यांचा जन्म. 'अग्निबाण अंतरंग आणि अवकाश झेप' या पुस्तकातून त्यांनी 'अग्निबाण, अंतराळयान, अंतराळशोध या भारताने केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. **१९४२ :-** लेखिका शुभांगी भडभडे यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत 'स्वामिनी', 'स्वयंभू', 'विळखा' मिळून १७ कादंबऱ्या, १२ चरित्रात्मक कादंबऱ्यांचा हिंदी अनुवाद, 'समाधी', 'जानकी', 'प्रतिक्षा' मिळून १७ सामाजिक कादंबऱ्या, 'सारांश', 'अस्तित्व' मिळून १० कथासंग्रह १३ एकांकिका नाटके तसेच १४ पुस्तके किशोर साहित्यावर आहेत. 'समाधी', 'जानकी', 'प्रतिक्षा' मिळून १७ सामाजिक कादंबऱ्या, 'सारांश', 'अस्तित्व' मिळून १० कथासंग्रह, १३ एकांकिका, नाटके तसेच १४ पुस्तके किशोर साहित्यावर आहेत. याशिवाय विविध वृत्तपत्रातून स्तंभलेखन अशी त्यांची साहित्यसंपदा आहे. **१९५१ :-** विविध वृत्तपत्रातून लेखन करणारे लेखक, पत्रकार सुभाषचंद्र शंकर जाधव यांचा जन्म. त्यांनी घेतलेल्या नामांकित कलावंतांच्या मुलाखतीवर 'वो भूली दास्तां' हे पुस्तक तर 'अतिरेक्यांबरोबर लढताना वीरगती प्राप्त झालेले मेजर प्रदीप ताथवडे यांचे चरित्र 'अमर योध्दा' या पुस्तकातून तसेच जे आर डी टाटा, जमशेदजी टाटा यांच्या चरित्रासह 'बसमधील गप्पा', 'महंमद रफी', 'संगीत यात्रा' मिळून १३ पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९५६ : -** लेखिका विद्या फडके यांचा जन्म. ह्यांची 'मंगलाष्टके', 'चला जागवूया मंगळागौर', 'सर्वोत्तम उखाणे', 'साखरपुडा ते वर्षासन', 'बाळाचे नाव काय ठेवाल?', 'सल्ला बहुमोलाचा' आदी पुस्तके प्रसिध्द. **१९७९ :-** इतिहास संशोधक, चरित्रकार नरहर रघुनाथ फाटक यांचे निधन. त्यांनी लिहिलेल्या गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या चरित्राला साहित्य अकादमीचा पुरस्कार. फाटक स्वतंत्र प्रज्ञेचे समीक्षक होते तसेच प्रचलित विचारप्रवाहाविरुध्द मतप्रदर्शन करुन वाद निर्माण करणे हे त्यांच्या वृत्तपत्रीय लेखनाचे वैशिष्टय. त्यांच्या साहित्यसंपदेत 'अर्वाचीन महाराष्ट्रातील सहा थोर पुरुष तसेच काही संतचरित्रे त्यांच्या नावावर आहेत. १९९७ :- तब्बल १५ वर्षे मराठी हृदयाच्या मनाला भावगीताचे वेड लावणारे भावगीतकार पी. सावळाराम यांचे निधन. कुसुमाग्रजांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी दिली होती. 'गंगा-यमुना' हा त्यंच्या गीतांचा संग्रह पुस्तकरुपाने प्रसिध्द झाला आहे. **१९९७ :-** पत्रकार, स्वातंत्र्यसेनानी मल्हार रंगनाथ उर्फ राजाभाऊ कुलकर्णी यांचे निधन. **२०१४ :-** शिक्षण, विज्ञान तंत्रज्ञान आणि विकास, जागतिक अणुविज्ञान आदी विषयांत विपूल प्रमाणात लेखन करणारे प्रा. भालचंद्र उद्गांवकर यांचे निधन. मूलकण भौतिकोन संशोधन करुन भौतिकशास्त्र संशोधनात त्यांनी मोलाची भर घातली.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ डिसेंबर

१) श्रीम.सुनिता सदानंद नर्बेकर मु.साखर ता.अलिबाग, २१-१२-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



डॉ. सुनील भोपाळे, प्रथम पुण्यतिथी, अलिबाग

# घरपट्टीवाढीविरोधात आंदोलनाचा इशारा

## प्रभारी मुख्याधिकाऱ्यांच्या गैरहजेरीत कर्मचाऱ्यास निवेदन

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

शहर आणि तालुक्यातील विविध समस्यांच्या निवारणार्थ प्रयत्नशील राहण्याच्या हेतूने स्थापन करण्यात आलेल्या पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचातर्फे नगरपंचायत पोलादपूरला गुरूवारी नागरिकांच्या स्वाक्षरीने घरपट्टीवाढीविरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. यावेळी महाड येथील मुख्याधिकारी प्रभारी म्हणून उपस्थित राहू शकले नसल्याने नागरिकांनी उपस्थित कर्मचाऱ्याकडे संतप्त भावना व्यक्त करीत निवेदन दिले.

यावेळी दर्पण दरेकर, संतोष मोरे, संदीप गांधी, सुनील भिलारे, बापू जाधव, गणेश कासुर्डे, मुश्ताक मुजावर,मजीद धामणकर, अविनाश जंगम, जाधव, कळमकर तसेच अन्य नागरिकांनी नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांसोबत चर्चा करताना नगरपंचायत प्रशासन नागरिकांचे विविध प्रश्न सोडविण्यात अपयशी ठरल्याचे सांगून प्रशासनाने कर्मचाऱ्यांचे आकृतीबंध व अन्य प्रश्न न सोडविल्याचे निदर्शनास आणून अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेतून घरपट्टीवाढीसाठी नियुक्त ठेकेदारांसाठीच्या नोटीशीवर प्रभारी मुख्याधिकारी यांची ऐन विधानसभा निवडणूक आचारसंहिता जारी असताना सही होऊन मतदान प्रक्रिया संपल्यानंतर नोटीसा नागरिकांना बजाविण्यात आल्या. नागरिकांना ठेकेदार अथवा प्रशासनाकडून कशासाठी लेझर मोजणी होत आहे याबाबत माहिती देण्याचे टाळण्यात आले आहे. एकूणच, नगरपंचायतीतील लोकप्रतिनिधी यांनी ठेकेदारधार्जिणा ठराव करून नागरिकांच्या हिताला बाधा आणल्याने प्रशासनाने जनसेवक म्हणून जनतेला उत्तरदायी असल्याचे सिध्द करण्याची वेळ आली असल्याचे यावेळी आवाहन उपस्थित नागरिकांतर्फे करण्यात आले.

यावेळी दर्पण दरेकर यांनी पोलादपूरकर जनतेला घरपट्टीवाढीबाबत जनतादरबार अथवा जनरल मिटींग आयोजित करून जनतेचे म्हणणे ऐकून घेत न्याय्य भूमिका घेण्याचे आवाहन केले. याप्रसंगी निवेदन स्विकारल्यानंतर नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या भावना मुख्याधिकारी महोदयांपर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले.

# घर घर संविधान पोहोचवण्याचा शिक्षकांचा निर्धार

**। माणगाव । वार्ताहर ।**



घर घर संविधान या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करुन विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घर घर संविधान पोहोचवण्यासाठी माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमधील मुख्याध्यापकांची कार्यशाळा गोरेगाव व माणगाव येथे दोन टप्प्यात गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या दरम्यान सुरेखा तांबट गटशिक्षणाधिकारी, माणगाव यांच्या संकल्पनेतून घर घर संविधान या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आखलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. या दरम्यान सुचवलेले सर्व उपक्रम स्वयंस्फूर्तीने प्रभावीपणे राबवून घर घर संविधान पोहोचवण्याचा निर्धार उपस्थित शिक्षकांनी आपला हात उंचावून केला.

सदर कार्यशाळेत मार्गदर्शन करताना संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांनी संविधान म्हणजे नक्की काय आणि ते समजून घेण्याची आवश्यकता का आहे, याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. संविधानाच्या माध्यमातून आपण आपला देश कसा बनवणार आहोत आणि आपल्या देशातील सर्व नागरिकांना काय देणार आहोत, याविषयी सविस्तर मांडणी केली. ठरलेल्या नियोजनानुसार आज कार्यशाळेत संविधानाविषयी मिळालेली माहिती उपस्थित शिक्षक आपल्या शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना देणार असून ऐकलेली माहीती विद्यार्थी आपल्या पालकांना सांगणार आहेत. उद्यापासून संविधानाविषयी परीपाठादरम्यान संविधानाचे अंतरंग उलगडणारी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. ही माहिती संकलित करून सर्व शाळांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण यांना सोपविण्यात आली आहे.

## क्रीडा महोत्सवास प्रारंभ

**तळा :** द.ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या क्रीडा महोत्सवास आज पासून सुरुवात. महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा महोत्सव सुरू झाला असून या महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांच्या शुभहस्ते झाले. त्यांनी उद्घाटनपर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना खेळातून व्यक्तिमत्व विकास कसा साधावा. खेळामध्ये प्राविण्य मिळवल्यानंतर शासकीय, निमशासकीय नोकरीमध्ये असणारे आरक्षण याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांना खेळण्यास प्रवृत्त केले. तसेच या कार्यक्रम प्रसंगी कार्यकारी मंडळाचे सदस्य महादेव बैकर उपस्थित होते. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोनम पवार यांनी केले. प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख प्रा. भरत चाळके. यांनी केले. तर मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी केले.

## विजय कोकणे यांना मानद डॉक्टरेट

रसायनी : जन शिक्षण संस्थान रायगड महाराष्ट्राचे संचालक डॉ. विजय हिरामण कोकणे यांना दिल्ली येथून आयकॉनिक पीस अवॉर्ड काउन्सिलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजन कुमार द्वारा २०२४ चा महिला सक्षमीकरण व कौशल्य विकास, समाजकार्य लेखन व संशोधनासाठी सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. या पुरस्काराचे स्वरुप सन्मान चिन्ह व फ्रेम प्रमाणपत्र असे आहे. ह्यूमन कॅपॅसिटी डेव्हलपमेंट ट्रेनिंग सर्व्हिसेसचे संचालक हिरामण कोकणे व सुमन कोकणे यांचे डॉ विजय कोकणे हे चिरंजीव आहेत ही विशेष नमूद करण्यासारखी बाब आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विजय कोकणे काम करीत आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, कै. सोनुबाई उर्फ अमीनाबीबी युसुफ काझी यांचे कायदेशीर वारस व उत्तराधिकारी श्री. कमाल उर्फ अब्दुल अझिझ उर्फ कमरू युसुफ काझी, यांस प्रकल्पग्रस्त शेतकरी म्हणून महाराष्ट्र शासन व सिडको ऑफ महाराष्ट्र लिमिटेड व सिडको यांने लागू केलेल्या गावठाण विस्तार १२.५ टक्के योजनेअंतर्गत त्यांचा मौजे तळोजा- II तालुका पनवेल, जिल्हा रायगड, येथे सिडको संचिका/फाईल क्र. तळोजा- II/४६७ अंतर्गत संपादित झालेला भुमी ऐवजी विकसित भूखंड मिळण्यास पात्र ठरविण्यात आले असून सदर भुखंड दिनांक : ३०/१०/२००७ रोजीच्या संगणकीय सोडतीनुसार अंतरीम इरादापत्र क्रमांकः सिडको/भूमी/साटयो/ तळोजा - II/ स. सोडत / १७९ / २००७ कै. सोनुबाई उर्फ अमीनाबीबी युसुफ काझी यांच्या नावाने देण्यात आले. ज्याचा तपशील खालीलप्रमाणे :

| गावाचे नाव | युनिट केस /निवाडा /ॲवार्ड नं. | सर्व्हे/हिस्सा नं. | संपादित क्षेत्र एकर गुंठा औंस | भूखंड | सेक्टर | भूखंड मिळण्याची पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|
| तळोजा- II ता. पनवेल जिल्हा रायगड | ११९ अ तलोजा पाचनंद-१६८ | २९३/0 | ३-७१-०० | ०४ | २५ | ३२५० चौ.मी. यापैकी त्यांच्या हिश्यातील विक्री योग्य क्षेत्रफळ १६२५ चौ.मी. |
| | | २८६/१ ते ४ | २-५९-८० | | | |
| | | २८५/१ ते ६ | १-६३-०० | | | |
| | | २८४/१ ते १२ ७/१२ | ३-१५-१० | | | |

वर उल्लेखित जमिन मिळकतीच्या संपादनाच्या मोबदल्यात इरादित झालेला नियोजित भुखंड हा आमचे अशील यांनी वर दर्शविलेले वाटपदार यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकतीसंदर्भातील साठेकरार/ खरेदीखत आमचे अशिलांनी त्यांच्या समवेत करण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडाचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, उपरोक्त भुखंडावर अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस-पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एल्एल्पी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवशक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदरहु भुखंडासंदर्भातील सिडकोची पूर्व परवानगी घेऊन व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे,

**सही अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्**
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ता: १७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे.
फोन नं. ०२२ - २७५७६१४२
E-Mail ID : ajeet_advocate@yahoo.co.in

### ग्रुप ग्रामपंचायत जिर्णे
**ता.पेण, जि.रायगड**

ग्रामपंचायत जिर्णे कडून १५ वित्त आयोग (सन २०२४-२५) निधी अंतर्गत खालील कामे करण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाचे ठिकाण | अंदाजपत्रकातील निधी |
|---|---|---|---|
| १. | मेडीक्लोर व टी.सी.एल कार्बोलींक पावडर चुना खरेदी करणे | ग्रा.पं क्षेत्र | १,३४,७२९/- |
| २. | कळद येथे विहिरीस फरशी व गटार व बांधणे | कळद | १,५०,०००/- |
| ३ | चितळकोंडी येथे विहिरीस फरशी व गटार बांधणे | चितळकोंडी | १,५०,०००/- |
| ४ | पाहिरमाळ येथील विहीर दुरूस्ती | पाहिरमाळ | २,१७,३६४/- |
| ५ | तुरमाळ येथील विहीर दुरुस्ती | तुरमाळ | २,१७,३६४/- |
| ६ | दिवाबत्ती साहित्य खरेदी करणे | ग्रा.पं.क्षेत्र | ७५,०००/- |
| ७ | तुरमाळ शालेय शौचालय दुरुस्त करणे | तुरमाळ | ५८,०६०/- |
| ८ | ताडमाळ २ येथे अंतर्गत रस्ता दुरुस्ती करणे | ताडमाळ २ | १,५०,०००/- |

**अटी व शर्ती**
१) अंदाजपत्रक व निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत मिळतील.
२) कामाचे मुल्यांकन पंचायत समिती व जिल्हा परिषदेकडील अभियंताकडून केले जाईल व त्याचप्रमाणे ग्रामपंचायती कडील उपलब्ध निधीनुसार रक्कम अदा केली जाईल.
३) कोणतीही एक किंवा सर्वच निविदा कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार सर्वस्वी मा.सरपंच यांस असेल.
४) निविदा २१/१२/२०२४ ते २७/१२/२०२४ दुपारी १२ वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील
५) निविदा २७/१२/२०२४ रोजी दुपारी २ वाजल्यानंतर उघडण्यात येतील
६) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदारास रु.५०० चे बाँडपेपर दोन जमिनदार देवून करारनामा स्वखुशीने करून द्यावयाचा आहे.

**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत जिर्णे,**
**ता.पेण, जि. रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत जिर्णे,**
**ता.पेण, जि.रायगड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे पोटलज खुर्द, ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) सौ. पायल केतन शहा. २) सौ. काजल राहुल ओटावत. | ६४ | २-४६-०० पैकी देणार यांचे क्षेत्र २-१६-०० | ०-७५ ०-१९ |
| | ६६ | ०-३१-४० | ५-२२ |
| | ६८ | ०-८७-०० | ०-०९ |
| | ७० | ०-०२-३० | ०-५० |
| | ७१ | ०-८८-०० | ०-०९ |
| | ७२ | ०-८८-०० | ०-३३ |
| | ८१ | ०-५३-०० | ०-२५ |
| | २६३ | ०-३१-९० | ४-४१ |
| | २६५ | ०-४५-०० | ०-१२ |
| श्री. नितीन डी. मशरू. | ६७ | ६-२०-१० पैकी देणार यांचे क्षेत्र १-००-०० | ६-९२ १-४० |

मौजे नांदगाव, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) सौ. काजल राहुल ओटावत. | १९ | ०-४९-०० | ०-१२ |
| २) सौ.पायल केतन शहा. | २६/२ | १-२०-०० | ०-३४ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती. लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- २१/१२/२०२४

सही/-
खरेदीदारांचे लेखक,
राठोड एण्ड एसोसिएट्स
श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,
श्री. राजेश एस. राठोड
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली,
ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. कांतिलाल मोरारजी काराणी यांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत हि. दिनांक २९/११/२०२४ रोजी विकी प्रमाणपत्राद्वारे दि. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. तर्फे वसूली अधिकारी यांचेकडून खरेदी केलेली आहे. सदर विकी प्रमाणपत्र हे अलिबाग येथील दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात ५३६७/२०२४ या नंबरने नोंदणीकृत केलेले आहे. तरी सदर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदर नमूद मिळकत ही आमच्या अशिलांनी नोंदणीकृत विक्री प्रमाणपत्राद्वारे खरेदी केल्यामुळे सदर मिळकती संदर्भात कोणत्याही प्रकारे, कोणीही व्यवहार करु नये व असा व्यवहार कोणत्याही नोंदणीकृत किंवा अनोंदणीकृत दस्ताद्वारे जर कोणी केल्यास, त्यास आमचे अशिल बंधनकारक राहणार नाही.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रं. | जुना भुमापन क्रं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ६९/३ | ६९/३+६९/४अ +६९/४ ब+ ७०/१+७१/१ | १७ | २३७४.५८ | ४७.५० |

वरील नमुद मिळकतीवर बांधण्यात आलेल्या 'श्री दत्तात्रेय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित' चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड, यातील दुकान गाळे क्रं. ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४ व १५ (चेंढरे ग्रामपंचायत घर क्रं. ११९१/७ ते १५), तळ मजला, क्षेत्र २८११ चौ.फू. (२६१.१५ चौ.मी) बांधकाम क्षेत्र, दुकान गाळा क्रं. १६ (चेंढरे ग्रामपंचायत घर क्रं. ११९१/१६) तळ मजला क्षेत्र १९१ चौ. फू. व दुकान गाळा क्रं. १७ (चेहरे ग्रामपंचायत घर क्रं. ११९१/१७) तळ मजला क्षेत्र २८५ चौ. फू.

अलिबाग,
दि. २०/१२/२०२४

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
बी.ए.एल.एल.बी.
रितूराज प्लाझा, शिवाजी चौक
अलिबाग-रायगड, फ्लॅट नं. १
मो. ०९८५००४२२३४

**मालमत्ता पुनर्प्राप्ती व्यवस्थापन शाखा,**
बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, पहिला मजला, २८, एस.व्ही.रोड, अंधेरी (प),
अंधेरी पश्चिम रेल्वे स्थानकाजवळ, मुंबई - ४०००५८. दूरध्वनी क्रमांक २६२१०४०६/०७,
ईमेल: asset.mnz@bankofindia.co.in

**शुद्धीपत्रक**

कृषीवल (रायगड आवृत्ती) वर्तमानपत्रात दि. १७.११.२०२४ रोजी, मे. रियलियन्स कन्स्ट्रक्शन (नाव कन्फर्म करणे),च्या खात्यासंदर्भात अ.क्र. ६ मध्ये मालमत्तेचे विवरण : प्लॉट क्र. ११६, ११७,११८,१२०,१२१,१२२,१२३,१२५,१२७ व १३०, सर्व्हे क्र. ३६/२ ए (२) व ३७/१, गाव कोथिंबे, ता. कर्जत, जि. रायगड, जमीन क्षेत्र : ५३३८० चौ फूट (बँकेकडे प्रत्यक्ष ताबा आहे) या संदर्भात ईलिलाव दि. २६.१२.२०२४ करिता ई-लिलाव विक्री सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. वरील मालमत्तेची ई-लिलाव विक्री तात्काळ स्वरूपात रद्द करण्यात येत आहे. लिलाव सूचनेच्या अन्य अटी व शर्ती अपरिवर्तित राहतील व उर्वरित मजकूर अपरिवर्तित राहील.

दिनांक : २१.१२.२०२४
ठिकाण : मुंबई

सही/-
**प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ इंडिया**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत जमिनीचे विद्यमान मालक श्री. शाम हिरामण वेळेनोर व श्री. सुमित शाम वेळेनोर यांनी सामाईक जमिन मिळकत कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भोगवटा धारक | खाते क्र. | गट क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| मौजे मांडला, ता.मुरूड, जि.रायगड | श्री. शाम हिरामण बेळेनोर व श्री. सुमित शाम बेळेनोर | ३५९ | ५८ | १-११-०० बागायत क्षेत्रापैकी ०-०८-९२ | ०.५१ |

वर नमुद क्षेत्र १-११-०० या बागायत क्षेत्रापैकी ०-०८-९२ हे बागायत क्षेत्र कायम स्वरूपी विकत घेण्याच्या बाबतीतील नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक श्री. शाम हिरामण बेळेनोर व श्री. सुमित शाम बेळेनोर यांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक २०/१२/२०२४

सही
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी,
ता.अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९२७२६२०००५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे आतोणे, ता.सुधागड, जि.रायगड. येथील जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. ललीत सदानंद गंध्रे रा. नेरळ जुनी बाजारपेठ, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड. | ७२ | १-३७-६० पैकी देणार यांचे क्षेत्र ०-३२-६० | ८-३१ १-०४ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ८ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- २१/१२/२०२४

सही/-
खरेदीदाराचे लेखक,
राठोड एण्ड एसोसिएट्स
**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
श्री. राजेश एस. राठोड
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली,
ता. सुधागड, जि. रायगड.
मो.९४२११६८७६३/९२७०३६७२९०

### जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हिजन सो. यांचे कोर्टात.....**

दिवाणी चौकशी अर्ज नं.१७३/२०२४

श्री. जयेश रघुनाथ भगत वगैरे — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांचे वडिल कै. रघुनाथ हरी भगत हे दिनांक ३१/१२/२०१२ रोजी अलिबाग सिव्हील हॉस्पिटल येथे मयत झालेले आहेत. यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळावा म्हणुन या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदारांच्या मागणीप्रमाणे अर्जदार यांचे वडिल कै.रघुनाथ हरी भगत यांचे वारस या नात्याने वारस दाखला देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन एक महिन्यांचे आत किंवा दि. २०/१/२०२५ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहुन आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे कै. रघुनाथ हरी भगत यांचे वारस म्हणुन वारस दाखला देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येवुन मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला देणेचा हुकुम अर्जदार यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.२०/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही — **लिपीक दिवाणी न्यायाधीश**

कोर्टाचा शिक्का

सही — **अधिक्षक दिवाणी न्यायाधीश**

### सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय

काँग्रेस भवन, तळ मजला, महर्षी कर्वे रोड, ता.अलिबाग,
जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक/फॅक्स क्र. ०२१४१-२२२०१३
ई-मेल् .ddr_rgd@rediffmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

अर्जदार स्नेहा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. श्रीबाग-२, ता.अलिबाग जि.रायगड यांनी गैरअर्जदार १) मे. श्री गणेश कॉर्पोरेशन पार्टनरशिप फर्म तर्फे पार्टनर श्री राजेश खांडेपारकर १३ नवतुषार को-ऑप. हौसींग, दिलीप गुप्ते मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ २) मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद, अलिबाग जि. रायगड यांचेविरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११ (३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

अलिबाग नगरपालिका क्षेत्रातील श्रीबाग नं. २ येथील भूखंड क्र. एम-६ क्षेत्र ३२०.०० चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत गैरअर्जदार यांना नोटीस बजावणी झाली आहे. परंतू सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व गैरअर्जदार यांना या नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, सदर मिळकतीचे अर्जदारास अभिहस्तांतरण करुन देणे संबंधीचे त्यांचे म्हणणे दिनांक २/१/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांचे काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १७.१२.२०२४

सही/-
**(प्र.का.जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

# होली चाईल्ड शाळेचा गुणदर्शन कार्यक्रम

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या ‘प्रभाविष्कार’ अंतर्गत होली चाईल्ड सी.बी.एस.इ. शाळेचा विविध गुणदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून आरसीएफ थळचे सीआयएसएफ डेप्युटी कमांडर संदीप चक्रवर्ती, संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, डॉ. प्रणाली पाटील, विविध ग्रामपंचायत सरपंच, सदस्य यांसह होली चाईल्ड सीबीएसई स्कूलच्या मुख्याध्यापिका वेणी वेल्लईम्मल्ल, उपमुख्याध्यापिका सदाफ शाहबाजकर, कॉलेजचे प्राचार्य, मुख्याध्यापक, मुख्य कार्यालयाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कारचे सादरीकरण केले.






## अष्टमी शाळेत क्रीडा स्पर्धा संपन्न



**। रोहा । वार्ताहर ।**

रोहा नगर पालिका अंतर्गत अष्टमी उर्दू शाळा क्र.५ या शाळेत वार्षिक क्रीडा स्पर्धा व विज्ञान प्रदर्शनाचा कार्यक्रम गुरुवारी (दि.१९) रोजी पार पडले. अष्टमी मुस्लिम समाज अध्यक्ष म. शफी पानसरे यांच्या हस्ते विज्ञान प्रदर्शनाचे तर केंद्र प्रमुख ईश्वर लाडे यांच्या हस्ते नाणे फेकीकरून क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

शाळेच्यावतीने दर वर्षी क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेत जय पराजय होत असताना मुलांनी खेळ खेळाडूवृत्तीने खेळावे. क्रीडा हा देखील शिक्षणाचा भाग असून खेळामुळे आपण तंदरुस्त राहतो व आपले आरोग्य देखील फिट राहते, असे मौलिक विचार केंद्र प्रमुख ईश्वर लाडे यांनी व्यक्त केले.

यावेळी मुस्लिम जमातीचे उपाध्यक्ष मुबीन दळवी, अफसर करजिकर, राहील नागोठकर, अ. रशीद डबीर, मुनव्वर पठाण, मन्सूर दर्जी, अजीम नाडकर, मन्सूर कचकोल, अल्ताफ चोरडेकर, अ. रहीमन नाडकर, इम्रान बुखारी, वसीम दळवी, नम्रता पानसरे, पूजा खुळे, जबीन मिटकर आदी ग्रामस्थ व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## आनंदवाडी शाळेचे घवघवीत यश

**। अलिबाग । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषदेतर्फे जि.प. शाळेच्या मुलांसाठी घेण्यात येणाऱ्या क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धांचे आयोजन सोमवारी (दि.१६) सांबरी शाळेत करण्यात आले होते. या स्पर्धेत इयत्ता पहिली ते चौथीच्या गटात राजिप शाळा आनंदवाडीच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यात समूहगीत गायन, पथनाट्य, समूह नृत्य, लंगडी मुली, माती शिल्पात प्रथम क्रमांक, लगोरी मुले आणि दोरी उड्यांत द्वितीय क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले आहे. त्याबद्दल शाळेतील सर्व सहभागी विद्यार्थी, पालक व मार्गदर्शन करणारे शिक्षक सूर्यकांत पाटील, मुख्याध्यापिका मंगला पाटील यांचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा रत्नप्रभा गोळे, अजित गोळे, जनार्दन सुर्वे, उमेश पुगांवकर, मनोज थळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्यांनी तसेच केंद्रप्रमुख मंगेश शेरमकर यांनी अभिनंदन केले आहे.



## विश्वनिकेतन टीमचा दुसऱ्यांदा विजय




**। रसायनी । वार्ताहर ।**

स्मार्ट इंडिया हॅकॅथॉनचे संपूर्ण देशामध्ये ५१ ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. लक्ष्मीनारायण कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी भोपाळ या ठिकाणी झालेल्या सॉफ्टवेअर एडिशन विभागांमध्ये खालापूर तालुक्यातील कुंभिवली येथील विश्वनिकेतन इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे.

मध्यप्रदेश पोलीस विभागाने दिलेल्या डेव्हलपमेंट अँड इम्प्लिमेंटेशन ऑफ फेस रिकगनायझेशन टेक्निक्स फॉर मध्य प्रदेश पोलीस डिपार्टमेंट प्रॉब्लेम स्टेटमेंटमध्ये विद्यार्थ्यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या मार्फत मिळालेल्या आरोपीच्या फोटोवरून आरोपीचे लोकेशन, त्याच्या घरचा पत्ता, फोन नंबर इत्यादी गोष्टींची माहिती मिळवली. आरोपीच्या स्केचेस आणि सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आरोपीची माहिती मिळवणे, स्त्रिया किंवा व्हीआयपी लोकांसाठी सुरक्षित मार्ग शोधणे इत्यादींवर संशोधन केले. या टीममधील जयेश थत्ते, सुदनवा कांची, अनुष्का साहू, अमित रजेगावकर, पंकज चव्हाण, विक्रम देवाडीकर विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम करून मध्य प्रदेश पोलिसांना आरोपीला शोधण्यासाठी नवीन सोल्युशन दिले.

## केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील जिते केंद्र स्तरीय क्रीडा स्पर्धा बळवली येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत संपन्न झाल्या. या क्रीडा स्पर्धांमध्ये केंद्रातील सर्व शाळांनी सहभाग घेतला होता. या वर्षी नव्यानेच घेण्यात आलेल्या लगोरी व बेचकीने नेम धरणे या खेळांमध्ये आदिवासी मुलांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर, सालाबादप्रमाणे राजिप खारपाडा शाळेने चॅम्पियनशिप पटकावली असून बलवली शाळेने देखील आपले स्थान उच्च स्थानावर ठेवले आहे. तसेच, केंद्रातील जिते, आंबिवली, गोविर्ले, वडमालवाडी, दुष्मी, ठाकुरपाडा, खैरासवाडी या शाळांनी सुद्धा बक्षिसे मिळवली आहेत. या स्पर्धा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री सावंत, शिक्षक वृंद व शाळा व्यवस्थापन कमिटी व केंद्रातील सर्व शिक्षक वृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.

## क्लासिफाईड
**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- वरसोली, रायगड.. आदर्श नगर येथे N.A.४.५ गुंठे चे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड.. समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटर चा प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.१.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्या साठी योग्य - ९८२२२५७९२९
- अलिबाग शहरातील नामांकित आर्किटेक्टस् फर्मसाठी अनुभवी ऑटोकॅड ड्राफ्टस्मन पाहिजे. संपर्क: ९८२२०५४७८८
- तात्काळ पाहिजे :- अलिबाग येथे हॉटेलमध्ये काम करण्यासाठी कुकचा हेल्पर आणि वेटर तसेच व्हेज आणि नॉनव्हेज बनविण्यासाठी पुरुष/महिला पाहिजे. संपर्क ९९६९५४१२१३, ९०२९०११५१६
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, ब्रेकफास्ट हेल्पर, हाऊस कीपर १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- अलिबाग-रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत.
Reception-House Keeping-Waiter-Helper-Cook- etc.
Phone: ९३२३१५२९९०.
Email: csskshirishkar@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## अध्यक्षपदी शंकर दळवींची नियुक्ती

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असो. च्या कार्यकारणीच्या सभेमध्ये शंकर दळवी यांची प्रशिक्षक कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे.



शंकर दळवी हे लेव्हल १ प्रशिक्षक म्हणून प्रमाणित आहेत. जिल्हाच्या क्रिकेट संघात दीर्घ काळ खेळाडू व कर्णधार म्हणून त्यांनी योगदान दिले आहे. दळवी यांनी महाराष्ट्र रणजी संघाचे सहाय्यक प्रशिक्षक, महाराष्ट्र महिला संघाच्या १९/२३ वर्षाखालील व वरिष्ठ महिलांच्या संघाचे मुख्य प्रशिक्षक, बीसीसीए तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये पश्चिम विभागाच्या वरिष्ठ महीला संघासाठी मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

### बळीराम क्रीडा मंडळ कबड्डी महोत्सव

## चार संघानी गाठली उपांत्यफेरी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बळीराम क्रीडा मंडळाच्या विद्यमाने ५१व्या कबड्डी महोत्सवानिमित्त काळाचौकी येथील आंबेवाडीच्या बळीराम मंडळाच्या पटांगणावर कबड्डी सामने सुरू आहेत. या स्पर्धेत बंड्या मारुती मंडळ व अमर क्रीडा (काळाचौकी) यांनी संघर्षपूर्ण लढतीनंतर पुरुष प्रथम श्रेणी गटाची उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. तसेच, शिवशक्ती मंडळ व लायन्स स्पोर्ट्स देखील उपांत्यपूर्व फेरीत दाखल झाले आहे.



पहिल्या सामन्यात काळाचौकीच्या अमर मंडळाने शिवनेरी सेवा संघाचा कडवा प्रतिकार ३२-३१ असा मोडून काढला. पूर्वार्धात लोण देत २०-१४ अशी आघाडी घेणाऱ्या अमरला उत्तरार्धात मात्र शिवनेरीने लोणची परतफेड करीत चांगलेच जेरीस आणले. परंतु, संघाला विजयी करण्यासाठी ते असमर्थ ठरले. दुसऱ्या उत्कंठावेधक लढतीत बंड्या मारुती मंडळाने सिद्धीप्रभा फाउंडेशनला २५-२४ असे चकवित आपली धोडदौड सुरूच ठेवली. क्षणक्षणाला काळजाचे ठोके चुकविणाऱ्या या सामन्यात पहिल्या डावात १२-११ अशी नाममात्र आघाडी बंड्या मारुती संघाकडे होती. शेवटी याच गुणाचा त्यांना फायदा झाला. याच गटात शिवशक्ती मंडळाने यंग प्रभादेवीला ३१-२१ असे रोखत आगेकूच केली. विश्रांतीपर्यंत चुरशीने खेळाला गेलेला हा सामना नंतर मात्र थोडासा एकतर्फी झाला. वैष्णव सूर्यवंशी, विराज सोहनी यांच्या विश्रांतीनंतरच्या जोशपूर्ण खेळामुळे शिवशक्तीला हा विजय मिळविता आला. शेवटच्या सामन्यात लायन्स स्पोर्ट्सने जय दत्तगुरुचा ३६-२५ असा पाडाव केला. लायन्स संघाने दोन्ही डावात एक-एक लोण देत आपला विजय निश्चित केला. मध्यांतराला १४-१२ अशी लायन्सकडे आघाडी होती. राज आचार्यच्या चतुरस्त्र खेळामुळे हे शक्य झाले.

## रोहित घरतने पटकाविले कांस्यपदक

**। उरण । प्रतिनिधी ।**



गोल्डन ज्यूबली युनिव्हरसरी इंटरनॅशनल टूर्नामेंट अँड ट्रेनिंग कॅम्प अंतर्गत दि. ११ ते १४ डिसेंबर दरम्यान मलेशिया येथे गोशीन रियू कराटे असो.तर्फे आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ८४ किलो व त्या वरील वजनी गटामध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारा रोहित शरद घरत यांने उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक पटकाविले आहे.

मलेशिया येथे आयोजित केलेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विविध देशातील एकूण २२० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. गोशीन रियू कराटे असो. संघटनेतर्फे आयोजित या स्पर्धेत उरण तालुक्यातील रोहित घरत याने दमदार कामगिरी करत कांस्यपदक मिळवून भारताचे नाव उज्वल केले आहे. या स्पर्धेसाठी रोहित घरत यांना सिहान. के. वसंतन, गोपाळ म्हात्रे, राजु कोळी, बळीराम घरत, राजू मुंबईकर, निकेश पाटील, राकेश म्हात्रे व आई-वडिलांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. परदेशात जाऊन भारताचे नाव उज्वल करणाऱ्या रोहितवर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### किशोर-किशोरी मुंबई जिल्हा खो-खो स्पर्धा

## ओम साईश्वर मंडळ, सरस्वती मंदिर हायस्कूल अजिंक्य

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने महाराष्ट्र अॅमॅच्युअर स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे १४ वर्षांखालील किशोर-किशोरी मुंबई जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा माटुंगा येथील ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेच्या अंतिम फेरीच्या सामन्यात किशोरींमध्ये ओम साईश्वर सेवा मंडळाने, तर किशोरांमध्ये सरस्वती मंदिर हायस्कूलने अजिंक्यपद मिळवले आहे.




या स्पर्धेतील किशोरांच्या अंतिम सामन्यात सरस्वती मंदिर हायस्कूलने सलग दोन अजिंक्यपद विजेत्या असलेल्या ओम साईश्वर सेवा मंडळावर ८-६ असा दोन गुणांनी निसटता विजय मिळवला आहे. या सामन्याच्या पहिल्या डावात सरस्वतीच्या प्रथमेश तर्पेने ओम साईश्वरच्या अधिराज गुरवला अचानक हल्ला करून बाद केल्याने व श्लोक जाधवला वरून गुप्ताने अवघ्या १० सेकंदात बाद केल्याने सामन्यात चुरस निर्माण झाली होती. ओम साईश्वरच्या अधिराज गुरव, श्राथीक गामी, आरव साटम, अर्णव राणे यांनी दिलेली लढत व्यर्थ गेली व त्याचबरोबर ओम साईश्वर सेवा मंडळाची अजिंक्यपद मिळवण्याची हॅट्रिक सुध्दा हुकली आहे.

किशोरींच्या अंतिम सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने श्री समर्थ व्यायाम मंदिराला जोरदार टक्कर देत एकतर्फी विजय साजरा केला व पहिल अजिंक्यपद खिशात घातले आहे. ओम साईश्वरने श्री समर्थचा १०-४ असा १ डाव व ६ गुणांनी धुव्वा उडवत विजेतेपदावर नाव कोरले आहे. सुरवाती पासूनच ओम साईश्वरच्या खेळाडूंनी जोरदार खेळ करत श्री समर्थच्या खेळाडूंना डोकवर काढण्याची जरासुद्धा संधी दिली नाही.

स्पर्धेतील विजेत्या पहिल्या चार संघांना अनुक्रमे रु. ७हजार, ५हजार, ३ हजार, २ हजार व चषक देऊन गौरवण्यात आले. तर, सर्वोत्कृष्ट संरक्षक- प्रथमेश तर्पे (सरस्वती), सोनम शेलार (श्री समर्थ), सर्वोत्कृष्ट आक्रमक- महेक आदवडे (सरस्वती), आर्या आचरेकर (ओम साईश्वर), अष्टपैलू- अधिराज गुरव (ओम साईश्वर), कादंबरी तेरवणकर (ओम साईश्वर) यांना मिळाले आहे.



# खराब झालेल्या अन्नामुळे...

मुलांनो, खराब झालेलं, कुबट वास येणारं अन्न खाऊ नये. असं अन्न खाल्ल्याने आपण आजारी पडू शकतो. अशा अन्नात बॅक्टेरिया असतात. ते पोटात गेले तर पोटदुखी, जुलाब, उलट्या असा त्रास होण्याची शक्यता असते. त्यामुळे अन्न खराब झालं आहे असं वाटलं तर ते खाऊ नका. असं अन्न खाल्ल्यामुळे काय त्रास होऊ शकतो याविषयी...

हेल्थ-वेल्थ

✻ वातावरणात अनेक जंतू असतात. शरीरातली रोगप्रतिकारक शक्ती या जंतूंशी लढते आणि त्यांना शरीरात जाण्यापासून रोखते. यामुळे आपण आजारी पडत नाही. पण अन्नातून पोटात गेलेले जंतू खूप घातक असतात.

✻ खराब झालेल्या अन्नात खूप बॅक्टेरिया म्हणजे जंतू असतात. ते खूप वेगाने वाढतात. या अन्नातून शरीरात एकाच वेळी मोठ्या संख्येने बॅक्टेरिया गेल्याने शरीर त्यांचा प्रतिकार करू शकत नाही आणि आपण आजारी पडतो.

✻ खराब झालेलं अन्न खूप जास्त प्रमाणात खाल्लं तर जंतूंशी लढण्याच्या शरीराच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

✻ काही बॅक्टेरियांच्या शरीरातून बाहेर येणाऱ्या चिकट स्रावामुळे पदार्थांना खूप घाण वास येतो.

✻ माणसांप्रमाणेच बॅक्टेरियांनाही जगण्यासाठी अन्न लागतं. हे अन्न ते अशा पदार्थांमधून मिळवतात. बॅक्टेरिया अन्नातल्या पोषक घटकांचं विघटन करत असल्याने ते निरूपयोगी होतं.

✻ घरचं अन्न चांगलं असतं. पण बाहेरचे पदार्थ खाताना विशेष काळजी घ्यायला हवी. वास येणारा पदार्थ खाऊ नये. प्रवासातही डब्यातले पदार्थ खराब होऊ शकतात. कोरडा खाऊ टिकतो. पण पोळी, पराठा, पोहे लवकर खराब होतात. त्यामुळे ते खराब झाले नाहीत ही खात्री करून मगच खा.

✻ खूप जास्त तापमानात बॅक्टेरिया टिकत नाहीत. त्यामुळे फ्रीजमध्ये ठेवलेले पदार्थ खाता येतील.

त्यामुळे पुढच्या वेळी कोणताही पदार्थ खाताना जास्त काळजी घ्या.

# लंडनची 'हेड ऑफ द रिव्हर' स्पर्धा

लंडनमधल्या थेम्स नदीत 'हेड ऑफ द रिव्हर' या बोटींच्या शर्यतीचं आयोजन केलं जातं. १९२६ मध्ये या स्पर्धेच्या आयोजनाला सुरूवात झाली. यंदाची स्पर्धा अनेक अर्थांनी अनोखी ठरली. कारण या स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच महिला सहभागी झाल्या होत्या. गेल्या वर्षीपर्यंत ही फक्त पुरुषांसाठीची स्पर्धा होती. 'हेड ऑफ द रिव्हर' म्हणजे रोईंगचा एक प्रकार आहे. यंदा या स्पर्धेत ३२१ संघ सहभागी झाले होते. त्यापैकी २५ संघ महिला रोअर्सचे होते. महिला विभागात 'टाईड वे स्कलर्स' हा संघ जिंकला. ऑस्ट्रेलियाचे माजी क्रिकेट आणि फुटबॉलपटू स्टीव्ह फेअरबेर्न यांनी ही स्पर्धा सुरू केली. ते रोईंगचे प्रशिक्षकही होते. शरीराची क्षमता वाढवण्यासाठी रोईंग हा सर्वात योग्य असा खेळ असल्याचं त्यांचं म्हणणं होतं. 'मायलेज मेक्स चॅम्पियन्स' हे त्यांचं ब्रीदवाक्य होतं.

थेम्स रोईंग क्लबमध्ये ते रोईंगचं प्रशिक्षण देत असत. ही



स्पर्धा आयोजित करण्याची कल्पना त्यांनी मांडली. १९२६ मध्ये झालेल्या पहिल्या स्पर्धेत २३ संघ सहभागी झाले होते. पहिली स्पर्धा झाली त्या दिवशी रविवार होता. सुटीचा दिवस असूनही या स्पर्धेला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर या स्पर्धेची लोकप्रियता वाढत गेली. दुसऱ्या वर्षी म्हणजे १९२७ मध्ये 'हेड ऑफ द रिव्हर' स्पर्धेत ४१ संघ होते. १९३६ मध्ये संघांची संख्या १२७ पर्यंत पोहोचली. १९४०-४५ या काळात दुसऱ्या महायुद्धामुळे स्पर्धा झाली नाही. १९४६ मध्ये स्पर्धेला पुन्हा सुरूवात झाली. यावेळी ७१ संघांनी सहभाग घेतला.

फन टाईम

# पर्वत असतात कसे?

तुम्ही डोंगरावर फिरायला जाता तेव्हा काय जाणवतं? इथे हवा मोकळी असते, इथे जमिनीपेक्षा गारवा जास्त असतो, इथली हवा जास्त शुद्ध असते. हा सगळा बदल तुम्हीही अनुभवला असेल. डोंगरावर असा बदल अनुभवायला मिळत असेल तर डोंगरापेक्षा कितीतरी उंच पर्वतावरील वातावरणातील किती बदल अनुभवास मिळत असेल याची कल्पना करा! विशाल, आकाशाला गवसणी घालणारे, दणकट पर्वत हे भूगोलातील महत्त्वाचं अंग आहे. म्हणूनच पर्वतांबाबत माहिती जाणून घ्यायला हवी. पर्वत जमिनीच्या वर असतात त्याचप्रमाणे समुद्राच्या आतही असतात. काही पर्वत एकटे सुळक्याच्या रूपात उभे असतात, पण बरेचदा पर्वतांच्या रांगा पहायला मिळतात. पर्वताच्या अत्युच्च भागास आपळ शिखर या नावानं ओळखतो. ही पर्वतावरील सर्वात उंचीवरील जागा असते.



भू वैज्ञानिकांच्या मते, जमिनीपासून १०० फुट (३०० मीटर) उंच असणाऱ्या भूभागास पर्वत म्हणतात. अशा या पर्वतांवर वातावरणाचा परिणाम होतो. इतक्या उंचीवर हवा अगदी थंड असते. कारण इतक्या उंचावर हवा सूर्यकिरणांमधील उष्णता ग्रहण करु शकत नाही परिणाम ती थंडगार राहते. पर्वतावर दर ५०० फूट उंचीवर तापमान १.८ डिग्री फर्नाइट नं कमी होतं. म्हणूनच आपण वर जावू तसं वातावरण थंड होतं जातं. तुम्हाला माहितीये, जगातील सर्वात उंच पर्वत प्रशांत महासागरातील 'मॉना की' हा आहे. या पर्वताचा अर्ध्यापेक्षा जास्त हिस्सा पाण्याच्या आत आहे. मॉना की ३३,४७४ फूट उंच आहे, त्यातील केवळ १३,७९६ फूटांचा हिस्सा पाण्याच्या बाहेर आहे.

जाणून घ्या

# संधी आंतरराष्ट्रीय कायद्यातल्या

दोस्तांनो, आपल्या देशात परदेशातल्या कंपन्या येतात. विविध कंपन्या एकमेकांमध्ये विलिन होतात. काहींचे करार होतात. मोठी कंपनी छोट्या कंपनीला खरेदी करते. या व्यवहारात कायद्याची महत्त्वाची भूमिका असते. सगळ्या गोष्टी कायद्याप्रमाणे होणं गरजेचं असतं. कंपनीच्या कारभाराशी संबंधित अनेक कायदे असतात. आंतरराष्ट्रीय, बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात मोठ्या प्रमाणावर आहेत. भारतीय कंपन्याही परदेशात व्यापार करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरचे कायदे तसंच विविध संधींचं ज्ञान असणाऱ्या वकिलांची मागणी वाढते आहे. तुम्हालाही कायद्याच्या क्षेत्रात करीअर करायचं असेल तर 'इंटरनॅशनल लॉ'चा पर्याय आहे.




बारावी किंवा कोणत्याही विषयात पदवी मिळवून तुम्ही लॉकडे वळू शकता. बारावीनंतर पाच तर पदवीनंतर तीन वर्षांचा कायद्याचा अभ्यासक्रम असतो. या क्षेत्रात करीअर करण्यासाठी परदेशी भाषांचं ज्ञान उपयोगी पडू शकतं. तुमच्याकडे लेखन कौशल्य असायला हवं. विविध देशांमधल्या कायद्यांचा अभ्यास करून त्याचं विश्लेषण करण्याची क्षमता हवी. सतत नव्या गोष्टी शिकायची तयारी असायला हवी.

करीअर टिप्स

आंतरराष्ट्रीय कायदे वेगवेगळ्या बाबींशी निगडित असतात. मानवाधिकार, निर्वासितांना मिळणारी वागणूक, पाण्याशी संबंधित तसंच अंतराळातल्या वावराशी संबंधित कायदे, शस्त्रास्त्र नियमन कायदा, गुन्हेगारांचं हस्तांतरण, आंतरराष्ट्रीय न्यायालयांमध्ये वकिली करणं असे असंख्य पर्याय तुमच्याकडे आहेत. तुम्ही तुमच्या आवडीच्या विषयात नैपुण्य मिळवून पुढे जाऊ शकता.

दोस्त हे मस्त

## डेझर्ट रेन फ्रॉग



दक्षिण आफ्रिका आणि नामिबियामध्ये अगदी छोट्या आकाराचा बेडूक आढळतो. 'डेझर्ट रेन फ्रॉग' या नावाने तो ओळखला जातो. या बेडकाची त्वचा पारदर्शक असल्याने त्याचे अवयव दिसू शकतात. पिवळ्या-मातकट रंगाच्या रेन फ्रॉगच्या शरीराला कायम वाळू चिकटलेली असते. प्रौढ डेझर्ट रेन फ्रॉगचा आकार चार ते सहा सेंटीमीटरपर्यंत वाढतो. खूप लहान आकारामुळे त्याला खाणाऱ्या प्राण्यांना हा बेडूक पटकन दिसत नाही. तसंच अंगाला लागलेल्या वाळूमुळेही त्याचं संरक्षण होतं.

खादाडी

## यम्मी अननस कँडी आईस्क्रीम

दोस्तांनो, उन्हाळा म्हटला की आईस्क्रीम, बर्फाचे गोळे खाल्ले जाणारच. ताज्या फळांपासून तुम्ही झटपट कँडी आईस्क्रीम बनवू शकता. अननसाचं कँडी आईसक्रीम कसं बनवायचं हे जाणून घेऊ. यासाठी अननस, एका लिंबाचा रस आणि दीड कप दूध घ्या. अननसाचे तुकडे करून घ्या. अननस आणि लिंबाचा रस ज्यूसरच्या भांड्यात घालून फिरवून घ्या. त्यात दूध घालून पुन्हा फिरवा. आता तुमच्याकडे कुल्फीचे किंवा कँडी आईसक्रीमचे साचे असतील तर त्यात हे मिश्रण भरा. त्यात काडी अडकवून साच्याला झाकण लावून फ्रीजरमध्ये ठेवा. सात ते आठ तासांनी काढा. मस्त कँडी आईसक्रीम तयार असेल. विविध फळं वापरून तुम्ही हे आईसक्रीम बनवू शकता.



जपा छंद


## चला, नाचू या...



मुलांनो, तुम्हाला नाचायला आवडतं का? नाचण्याचे खूप लाभ आहेत. आनंदी आणि तंदुरुस्त राहायचं असेल तर थोडा वेळ का होईना नाचायला हवं. नाचाच्या क्लासलाही जाता येईल. नाचल्याने मूड चांगला होतो. त्यामुळे कधी उदास वाटत असेल तर गाणी लावून नाचून घ्या. यामुळे हृदयाचं आरोग्य उत्तम राहतं शिवाय शरीर लवचिक होतं.

योगा टाईम

## भ्रामरी प्राणायाम



छोट्यांनो, अभ्यास करायचा, काही शिकायचं तर मन एकाग्र करावं लागतं. एकाग्रता वाढवण्यासाठी तुम्ही भ्रामरी प्राणायाम करू शकता. हे करण्यासाठी पद्मासनात किंवा मांडी घालून बसा. हात कानांजवळ न्या अंगठ्याने कान बंद करून घ्या. उरलेली चार बोटं डोक्यावर ठेवा. डोळे बंद करा. दीर्घ श्वास घेऊन तो सोडताना भुंग्यासारखा आवाज काढा. आवाज काढताना २० ते ३० सेकंद श्वास रोखून धरा. ही कृती पाच वेळा करा. यामुळे ताणही कमी होतो आणि आपल्याला ताजंतवानं वाटतं.

# बनवा तुमची स्टिरिओ सिस्टिम

तुमच्या लहान बहिणीला तुम्हाला काहीतरी द्यायचंय. काही तरी स्पेशल. स्वत: बनवलेलं. पण काय द्यावं हे सुचत नाहीये. मग एक सोपी आणि मस्त आयडिया आहे. घरातल्याच काही वस्तू वापरून तुम्ही एक स्टिरिओ सिस्टीम तयार करू शकता. तुमच्या बहिणीच्या भातुकलीसाठी किंवा डॉलहाऊससाठी ही एक छान भेट ठरेल आणि तुमची बहिणही खूश होऊन जाईल.



साहित्य : चार रिकाम्या काडेपेट्या, एक मोठ्या आकाराची रिकामी काडेपेटी किंवा पुठ्ठ्याचा खोका, काळं स्केच पेन, करड्या (ग्रे) रंगाचा चार्ट पेपर, ॲल्युमिनिअम फॉइल, कात्री आणि गम


कृती : ✻ चार छोट्या काडेपेट्यांच्या दोन दोनच्या जोड्या करून एकावर एक आडव्या चिकटवा. या काडेपेट्यांवर ग्रे कागद गुंडाळा. हे तुमच्या स्टिरिओ सिस्टीमचे स्पीकर्स असतील.

✻ मोठ्या काडेपेटीवरही ग्रे कागद गुंडाळा. हा तुमच्या स्टिरिओचा डेक असेल.

✻ स्पीकर्सच्या बाहेरच्या बाजूला उजव्या आणि डाव्या कोपऱ्यात काळ्या स्केच पेननी दोन छोटी वर्तुळं काढा. ✻ मग ॲल्युमिनिअम फॉइलवर एक छोटं आणि मोठं वर्तुळ काढा आणि तो भाग कापून घ्या. या दोन वर्तुळांपैकी छोटं वर्तुळ स्पीकरच्या वरच्या बाजूला आणि मोठं खालच्या बाजूला लावा. अशाप्रकारे दोन्ही स्पीकर्सना वर्तुळं चिकटवून घ्या. ✻ मोठी काडेपेटी हा तुमचा मुख्य डेक. त्यावर काळ्या स्केचपेनने रेडिओच्या खुणा करा. तसंच कॅसेट प्लेअरचं चित्र काढून घ्या. सीडी प्लेअरचं चित्रही तुम्ही काढू शकता. तुमच्या घरचा डेक बघून तुम्ही हा खेळण्यातला डेक तयार करू शकता. ✻ शेवटी मुख्य डेकला स्पीकर्स चिकटवा. झाली तुमची स्टिरिओ सिस्टिम तयार. आता ही छानशी भेट तुमच्या छोट्या बहिणीला द्या.

करून तर बघा

रंगवा



# दक्षिण आफ्रिकेत दडलेला 'लेसोथो'

दक्षिण आफ्रिका हा देश आपल्याला माहीत आहे. या देशात येणाऱ्या पर्यटकांची संख्याही मोठी आहे. पण याच देशात अजून एक छोटासा देश वसला आहे असं सांगितलं तर कोणालाही आश्चर्य वाटेल. 'लेसोथो' असं या देशाचं नाव असून फक्त २० लाख लोक तिथे राहतात. हा देश सर्व बाजूंनी दक्षिण आफ्रिकेने वेढलेला आहे. दक्षिण आफ्रिकेसारख्या मोठ्या देशामुळे लेसोथोकडे कोणाचं पटकन लक्ष जात नाही. असं असलं तरी इथेही भरपूर निसर्गसौंदर्य पहायला मिळतं. या देशात वन्य प्राणीही मोठ्या संख्येने आहेत.




लेसोथोचा बराचसा भाग डोंगराळ आहे. इथल्या लोकांना 'बॅसोथो' असं म्हणतात. 'बासुटोलँड' हे लेसोथोचं जुनं नाव. सोथो आणि इंग्रजी या इथल्या अधिकृत भाषा आहेत. लेसोथो हा गरीब देश असून इथली ४० टक्के जनता खूप गरीब आहे. लेसोथो हा उंचावर वसलेला देश असल्याने त्याला 'द किंग्डम इन द स्काय' असं म्हणतात. लेसोथो समुद्रसपाटीपासून २१६१ मीटर उंचीवर आहे. पूर्णपणे एक हजार मीटरपेक्षा जास्त उंचीवर असलेला लेसोथो हा एकमेव देश आहे.

सफर देशांची

'मासेरू' ही या देशाची राजधानी. 'कॅलेडॉन' नदीच्या किनारी हे शहर वसलं आहे. शेती आणि पशुपालन हे इथले प्रमुख व्यवसाय आहेत. या देशात दक्षिण आफ्रिकेतून वस्तू आयात केल्या जातात. इथे हिऱ्यांच्या खाणी आहेत. ऑक्टोबर ते एप्रिल या काळात इथे पावसाळा असतो तर वर्षातले दहा महिने भरपूर सूर्यप्रकाश असतो. आफ्रिकेतलं सर्वात उंच स्की रिसॉर्ट लेसोथोमध्ये आहे. 'लेसोथो लोटी' हे इथलं चलन. पण दक्षिण आफ्रिकेत ते स्वीकारलं जात नाही.

# स्वागताला सज्ज कोण?

तुम्ही कोणाच्या घरी पाहुणे म्हणून गेलात आणि घरातल्या मुलांनी त्यांच्या आई-बाबांना ओरडून सांगितलं की बघा कोण आलंय, तर तुम्हाला कसं वाटेल? तुम्हाला दारातच उभं करून मुलं खेळायला किंवा त्यांच्या कामाला गेली तर आई-वडिलांनी त्यांना काहीच शिकवलं नाही असंच तुम्हाला आणि तुमच्या आई-बाबांना वाटेल. बरोबर ना. म्हणूनच तुम्हीही घरी आलेल्या पाहुण्यांशी नीट वागायला हवं. त्यांचं स्वागत करायला हवं. तुम्ही एक चित्र डोळ्यासमोर आणा. तुमच्या घरात तुम्ही टिव्ही पाहताय, खेळायला जायची तयारी करताय किंवा अभ्यास करताय. आई कामात आहे. बाबाही लॅपटॉपवर बिझी आहेत. अचानक तुमच्या घराची बेल वाजते. तुम्ही जाऊन दार उघडता. पाहुणे आल्याचं तुम्ही आईला ओरडून सांगता आणि पुन्हा तुमच्या कामाला लागता किंवा खेळायला घराबाहेर पळता. ओळखीचं कोणी असेल तर तुम्ही फार फार तर नमस्कार करता.




अशा वेळी तुमची आई येईपर्यंत पाहुण्यांना दारातच उभं राहावं लागतं. तुम्हाला या वागण्यात काही वावगं वाटत नाही. पण आलेल्या पाहुण्यांना तुमचं वागणं नक्कीच आवडणार नाही.

आलेल्या पाहुण्यांचं स्वागत करणं हे काम आई-बाबांचं. आपला त्याच्याशी काहीच संबंध नाही असा विचार आजची मुलं करतात. पण घर तुमचंही असतं. त्यामुळे आलेल्या पाहुण्यांचं तुम्हीही नीट स्वागत करायला हवं. पाहुण्यांना बसवून तुम्ही थोडा वेळ त्यांच्याशी गप्पा मारू शकता. थोड्या मोठ्या वयाची मुलं सरबत आणि आणि खाऊ पाहुण्यांना देऊ शकतात.

धमाल

आई-बाबा आपलं काम आटोपून येईपर्यंत तुम्ही पाहुण्यांना वेळ द्यायला हवा. खेळायला मित्रमंडळी बोलवत असतील तर त्यांना तुम्ही थोडा वेळ थांबायला सांगू शकता किंवा एखाद्या दिवशी खेळायला दांडीही मारता येते. पाहुण्यांशी गप्पा मारल्यात तर त्यांना बरं वाटेल आणि तुमचं कौतुकही होईल. त्यामुळे पुढच्या वेळी पाहुण्यांचं स्वतःहून स्वागत करा.

ठिपके जुळवा



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) ताश्कंद करार कोणत्या दोन देशांदरम्यान झाला?
२) भारतातला पहिला व्हॉईसरॉय कोण?
३) पहिली गोलमेज परिषद केव्हा भरली होती?
४) प्लासीची लढाई कोणामध्ये झाली?
५) भारतीय संसदेची एका वर्षात किती अधिवेशने होतात?
६) विधानसभेच्या सर्वाधिक जागा असलेलं देशातलं राज्य कोणतं?
७) राज्यपालांची नेमणूक कोण करतं?
८) 'सनी डेज' या पुस्तकाचे लेखक कोण?
९) 'यक्षगान' हा कोणत्या राज्याचा नृत्यप्रकार आहे?
१०) कॅमेरूनची राजधानी कोणती?

उत्तर : १) भारत-पाकिस्तान २) लॉर्ड कॅनिंग ३) नोव्हेंबर १९३० ४) बंगाल-सिराजउद्दौला ५) तीन ६) उत्तर प्रदेश ७) राष्ट्रपती ८) सुनील गावसकर ९) कर्नाटक १०) याऊंडे




# अभिनेत्री आशा काळे यांना गदिमा पुरस्कार

**रंगबहार**
**शरद कोरडे**






मराठी रंगभूमी आणि मराठी चित्रपट क्षेत्रात गेल्या चार दशकाहून अधिक काळ रसिकांच्या मनावर आपल्या सोज्वळ व्यक्तिमत्त्वाने व कसदार अभिनयाने अधिराज्य गाजवणाऱ्या आशा काळे यांना यावर्षीचे गदिमा प्रतिष्ठानचे पुरस्कार जाहीर झाल्याने मराठी प्रेक्षक आनंदून गेला आहे. गदिमा प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त आनंद माडगूळकर यांनी ही घोषणा केली.

आधुनिक वाल्मिकी म्हणून ग.दि. माडगूळकर यांना सारा महाराष्ट्र ओळखतो. त्यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात हा समारंभ पार पडला. सुप्रसिद्ध नाटककार श्रीनिवास भणगे यांचे हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक शिक्षणतज्ज्ञ डॉ.न.म. जोशी, विश्वस्त प्रा. प्रकाश भोंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

आशा काळे यांनी नाटक व चित्रपट या दोन्ही माध्यमांतून आपली अभिनय कारकिर्द धडकली. आशा काळे यांना त्यांच्या चित्रपट कारकिर्दीत गदिमा यांनी लिहिलेल्या गीतांवर चित्रपटात अभिनय करण्याची संधी मिळाली नाही. कारण या कालावधीत जगदीश खेबुडकर, सुधीर मोघे यांची गीते चित्रपटात असत; परंतु त्यांच्या नावाने पुरस्कार मिळाल्याने मला गदिमांचा आशिर्वाद मिळाला आहे, असे त्यांनी सांगितले. आशा काळे यांचे पहिले प्रसिद्ध नाटक 'वाहतो मी दुर्वांची जुडी' यामुळे यांनी महाराष्ट्रभर लोकप्रियता मिळाली व त्यांच्या 'ताई'च्या भूमिकेमुळे त्यांच्या अभिनयाला नवीन आयाम मिळाले. तसे पाहिले तर आशा काळे यांचे हे अभिनेत्री म्हणून पहिले नाटक नव्हते व लेखक म्हणून बाळ कोल्हटकर यांचेही 'दुर्वांची जुडी' हे पहिले नाटक नव्हते. त्यापूर्वी कोल्हटकरांनी 'मुंबईची माणसं', 'एखाद्याचं नशीब', 'स्वप्न मंगला', 'प्रतिष्ठित भामटे', 'मला निवडून द्या', 'दुरितांचे तिमीर जावो', 'आकाशगंगा', व 'सीमेवरून परत जा' ही सात नाटके त्यांनी लिहिली होती व ती जयराम शिलेदार, चिंतामण कोल्हटकर, भालचंद्र पेंढारकर यांच्या नाट्यसंस्थेने यशस्वीपणे केली होती. मराठी रंगभूमीवर १९६४ साली आलेले 'दुर्वांची जुडी' हे बहिणभावांच्या निरपेक्ष प्रेमावर आलेले पहिले कौटुंबिक नाटक! एका मध्यमवर्गीय सुसंस्कृत कुटूंबांतील मोठी मुलगी आपल्या आईच्या मृत्यूनंतर त्या कुटूंबाची आई होते. आपले थकलेले वडील व वाईट संगतीला लागून बिघडलेला धाकटा भाऊ यांचे संगोपन ती प्रेमाने करते. भावाचे नवनवीन उपद्व्याप ती आईच्या मायेने पोटात घालते व वडिलांनाही आधार देते. भावाबहिणीच्या नातेसंबंधांवर आलेले हे पहिलेच नाटक प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. या नाटकाचा पहिला प्रयोग सांगली येथे १९ जून १९६४ रोजी झाला. या नाटकात आशा काळे यांच्यासह बाळ कोल्हटकर,

श्री जोगळेकर, शांतनुकुमार यांच्या भूमिका होत्या. नायिका म्हणून पदार्पणातच आशा काळे यांनी रंगभूमीला आपली दखल घ्यायला लावली.

आशा काळे यांचे रंगभूमीवरील हे पहिलेच काम नव्हते. व्ही. शांताराम यांच्या राजकमल कलामंदिरतर्फे बाबूराव पेंढारकर यांच्या नेतृत्वाखाली एक नाट्यशाखा निर्माण करण्यात आली व राजकमलच्या वैभवाला व भव्यतेला शोभेल अशी नाट्यकृती तयार करण्याचे ठरले. खरे शास्त्री यांनी लिहिलेले 'शिवसंभव' हे नाटक पक्के करण्यात आले. या नाटकात बाबूराव पेंढारकर यांचेसह केशवराव दाते यांनीही भूमिका केली होती. या नाटकातील हळदी कुंकूवाचे एका प्रसंगात सात-आठ तरूणींसह एक तरूणी आशा काळे होती. ही तरूणी या समारंभात एक नृत्यही करते. या तरूणीचे उच्चार व भाषा शुद्ध होती. नृत्याचे अंग असल्याने चेहरा भावनाशील होता, रंगभूमीवर वावरताना जी धीटाई लागते ती तिच्याकडे होती. बाळ कोल्हटकरांनी तिचे काम पाहून बाबूराव पेंढारकर यांची संमती घेऊन तिला त्यांच्या 'सीमेवरून परत जा' या सिकंदराच्या ..... केलेल्या आक्रमणावर आधारीत नाटकात तिला राजकुमारी विषकन्येची छोटी भूमिका दिली. त्यानंतर त्यांच्यापुढील 'वाहतो ही दुर्वांची जुडी' मध्ये आशा काळे नायिका झाल्या. बाळ कोल्हटकरांच्या पुढील 'एखादी तरी स्मीतरेषा', 'देव दिनाघरी धावला', 'मुंबईची माणसं', 'लहानपण देगा देवा', 'वाऱ्यांत मिसळले पाणी', 'वेगळं व्हायचंय मला' आदी नाटकांतून आशा काळे यांनी महत्त्वाच्या भूमिका केल्या. सोज्वळ व देखणा चेहरा, प्रसंगानुरूप बदलणारा आवाज यामुळे त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली. शं.ना. नवरे यांनी जयवंत दळवी यांच्या 'महानंदा' कादंबरीवर आधारीत 'गुंतता हृदय हे' या नाटकात आशाताईंनी महानंदेचे काम केले तर नायक बाबुलचे काम डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी केले होते. प्रभाकर पणशीकर यांच्या 'नाट्यसंपदा' या संस्थेतर्फे वसंत कानेटकर लिखित 'बेईमान' या आदिवासी कामगार स्त्रीचे काम केले होते. पुढे नाट्यसंपदेच्या 'फक्त एकच कारण' व 'महाराणी पद्मिनी' व 'विषवृक्षाची छाया' या कानेटकरांनी लिहिलेल्या नाटकांतून कामे केली. पुढे 'नल-दमयंती', 'पाऊलखुणा', 'वर्षाव', 'साटंलोटं' आदी नाटकांतून कामे केली, इतकेच नव्हे तर 'संगीत सौभद्र' या संगीत नाटकांतूनही त्यांनी काम केले. आशा काळे यांनी ज्या ज्या नाटकांतून ज्या ज्या भूमिका केल्या, त्यावर आपल्या अभिनयाची व व्यक्तित्त्वाची मोहोर उमटविली. एक संवेदनशील अभिनेत्री म्हणून त्यांनी अजरामर केलेल्या भूमिकांत दुर्वाची जुडी मधील ताई, 'गुंतता हृदय हे' मधील महानंदा, 'महाराणी' पद्मिनीमधील, 'घर श्रीमंताचं' मधील आध्यात्मिक, भक्तीपूर्ण आई, 'वेगळं व्हायचंय मला' मधील वहिनी, आदी भूमिका मराठी रसिक केव्हाच विसरणार नाही.

आशा काळे यांचे जन्मगाव कोल्हापूर मधील गडहिंग्लज. तेथे २३ नोव्हेंबर १९४८ साली त्यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. त्यांनी वयाच्या चौदाव्या वर्षापासून नाटकात काम करण्यास सुरुवात केली. कथ्थक नृत्याचे त्यांनी शास्त्रशुद्ध शिक्षण घेतले असल्याने सुरूवातीला त्यांनी नृत्याचे कार्यक्रमही केले. भालजी पेंढारकर यांनी त्यांच्या 'तांबडी माती' या १९६९ सालच्या चित्रपटात त्यांना प्रथम भूमिका दिली. या चित्रपटात दादा कोंडके, आशा काळे, अनुपमा, निळू फुले, ललिता पवार यांच्या भूमिका होत्या. त्यानंतर त्यांनी 'सतीचं वाण' १९६९, 'गणानं घुंगरू हरवलं' १९७०, 'चुडा तुझा सावित्रीचा', १९७१, 'हा खेळ सावल्यांचा १९७६', 'घर गंगेच्या काठी', 'ज्योतिबाचा नवस' १९७५, 'कैवारी' १९८१, 'चांदणे शिपीत जा' १९८२, 'चोराच्या मनात चांदणे', 'देवता', 'थोरली जाऊ', 'बंदिवान मी संसारी', 'बंधन', 'बाळा गाऊ कशी अंगाई', 'सतीची पुण्याई', 'सासुरवाशीण', 'हिच खरी दौलत', पुत्रवती, 'कुलस्वामिनी अंबाबाई', 'आयत्या बिळावर नागोबा', 'आई पाहिजे', 'अशी रंगली रात' आदी चित्रपटांतून त्यांनी आठवणीत राहणाऱ्या महत्त्वाच्या भूमिका केल्या. 'पुत्रवती' या १९९६ सालच्या भास्कर जाधव यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांतील त्यांची शेवटची भूमिका असावी. या चित्रपटात अविनाश नारकर, सुकन्या कुलकर्णी, बाळ धुरी, स्मिता तळवळकर व निळू फुले यांच्या भूमिका होत्या. हा चित्रपट १९ एप्रिल १९९६ मध्ये प्रदर्शित झाला होता. आशा काळे यांनी यांच्यावर चित्रित झालेली अनेक गाणी गाजली होती. त्यातील 'बाळा गाऊ कशी अंगाई' मधील 'लिंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई', 'हा खेळ सावल्यांचा' मधील 'गोमू संगतीनं माझ्या तू येशील का?' 'देवता' मधील 'खेळ कुणाला दैवाचा कळला', 'सतीची पुण्याई' मधील 'सांगू कशी प्रिया मी माझे मन कळेना', 'कुलस्वामिनी अंबाबाई' मधील 'आम्ही प्रतिवता नारी' आदी गीते आपण विसरू शकत नाही.आशा काळे यांना यापूर्वी ठाणे महापालिकेचा 'गंगाजमुना पुरस्कार' महाराष्ट्र शासनाचा 'व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार', 'संस्कृती दर्पण पुरस्कार' तसेच अखिल भारतीय नाट्य परिषदेचा जीवन गौरव पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यात चित्रपटसृष्टीतील सन्मानाच्या गदिमा पुरस्काराने भर पडली आहे.

**




















# सप्तसुरांचा अधिपती संगीतसुर्य सी. रामचंद्र



**श्रीराम शेट्ये**

ही कहाणी आहे एका महान संगीतकाराची ज्यांना सी. रामचंद्र म्हणून सारे जग ओळखते. त्यांचे खरे नाव रामचंद्र नरहर चितळकर. त्यांचा जन्म १२ जानेवारी १९१८ साली अहमदनगर जिल्ह्यातील चितळी या गावी झाला. चितळी हे पुनतांब्याच्या शेजारील गाव आहे. त्यांचे वडील नरहर चितळकर हे रेल्वेमध्ये नोकरी करीत होते.

त्यांच्या वडीलांची दोन लग्ने झाली होती. राम हा त्यांच्या दुसऱ्या पत्नीपासुन झालेले अपत्य होते. रामचे पालनपोषण, वात्सल्य सर्व मोठ्या (सावत्र) आईनेच केले. रामच्या सख्ख्या आईने रामवर कधीच प्रेम केले नाही.

राम महिन्याभराचा असेल आणि रामच्या वडिलांची बदली झाली. रामला डोंगरगड या वडिलांच्या नोकरीच्या गावी जावे लागले. हा डोंगरगड निसर्गसंपन्न होता. चोहोंबाजूनी हिरव्यागार डोंगरानी वेढलेले हे गाव जणू निसर्गाच्या ओंजळीतच वसलेले होते. वनराईंने बहरलेल्या तिथल्या वाऱ्याच्या स्वरात खचितच संगीताचा गोडवा होता. असंख्य निनावी पाखरांनी अगणित रागिणी त्या गावातील झाडावर बसून छेडल्या असतील.

रामच्या मोठ्या (सावत्र) आईच्या वागण्यात, बोलण्यात संगीत ओसंडून वाहत असे. वडिलांनाही संगीताचा नाद होता. ते वेळीअवेळी नाट्यगीत घरातच मोठ्या आवाजात गात गात काम करीत असत. या सगळ्या वातावरणात रामच्या बालमनात संगीताची बीजे खोलवर रोवली जात होती.

वडिलांच्या नोकरीच्या निमित्ताने रामचे बालपण डोंगरगड, नागपूर, विलासपूर, गोंदिया इत्यादी गावांतून भटकत राहिले. बालपणा बरोबर थोडी समजही आली. डोक्यावर जंगली लाकडांचे भारे घेऊन सांजवेळी निघालेल्या गोडीणींची (आदिवासींची) गाणी रामच्या कानांना आवडू लागली. ती ऐकण्यासाठी राम खेळ सोडून स्तब्ध उभा राहू लागला.

रामचे वडील रामला कधी तमाशा बघायला न्यायचे तर कधी नाटक, सर्कस. यातूनच रामचा संगीत आणि अभिनय याकडचा ओढा वाढत चालला होता. शालेय शिक्षणात फारसा रस नव्हता. एक वेळ राम परीक्षेत नापास झाला होता. अवघे नव वर्षाचे वय असेल तेव्हा. रात्री वडील कामावरुन आल्यावर त्यांना ही वार्ता समजली. त्यांनी शिक्षा म्हणून रामला अंगावरचे सर्व कपडे उतरवायला लावले आणि दिगंबरला आहे त्या अवस्थेत घरातून हाकलून दिले. राम वाट चुकलेल्या कुत्र्याच्या पोरासारखा दिशाहीन गतीने चालू लागला होता. कितीतरी वेळ चालत होता. राग ओसरल्यावर वडिलांना उपरती झाली. रात्री सायकल घेऊन परत ते रामला शोधायला गेले. त्याला परत घरी घेऊन आले.

रामच्या वडिलांनी रामला एकाचवेळी दोन शाळांत घातले होते. न्यु इंग्लिश स्कूलच्या इंग्रजी पहिल्या इयत्तेत आणि श्रीराम संगीत विद्यालयाच्या प्रारंभ वर्गात. संगीत विद्यालयाचे सप्रे मास्तर राम वर खुप खुष होते. ते म्हणायचे हा मुलगा एक दिवस नाव काढेल. सप्रे मास्तर अतिशय प्रेमळ, हसतमुख होते. शिकवता शिकवता ते वा: राम!,वा: राम !! म्हणत. ग्रामीण भागातील रंगमंचावर लोकांसमोर रामला उभे करण्याची एकही संधी ते सोडत नसत. गावातील 'संत सखू' या नाटकात रामला विठ्ठलाची भुमिका करण्यासाठी मास्तरांनी प्रोत्साहन दिले.

नाटक आणि चित्रपट यांची रामला आवड होती. म्हणूनच नागपूरात शंकरराव सप्रे यांच्याकडे त्याने संगीत शिक्षण घेतले. पुढे गंधर्व विद्यालय पुणे येथे श्री. विनायक बुवा पटवर्धन यांच्याकडे संगीत अध्ययन केले.

उपजत गोड गळा, चौकसपणा, तीव्र ग्रहणशक्ती आणि उपजत कष्टाळू वृत्ती यामुळे तो यशाच्या जवळ जाऊ लागला. दरम्यान नागपूर शहरात असताना त्याला देशी विदेशी मुके चित्रपट (मुकपट) पहायचे व्यसन लागले. एकदा तर पैसे नव्हते म्हणून एका पानवाल्याचे पैसे चोरून त्याने चित्रपट पाहिला.

एक वेळ अशी आली की रामला एका श्रीमंत माणसाला दत्तक देण्याचा निर्णय रामच्या वडिलांनी घेतला. तो माणूस गडगंज श्रीमंत होता राम आयुष्यभर सुखात राहील हीच वडिलांची भावना होती. परंतु हे ऐकून व्याकूळ झालेल्या रामची अवस्था बघून वडील गहिवरले त्यांनी माघार घेतली. नंतर वडिलांनी रामला गिरणीत नोकरी करण्यासाठी त्याचा मोठा भाऊ नाना याच्याकडे सोलापूरला पाठवले.

राम दिवसभर घरात बसून रहात असे. रामला चित्रपटात काम करायची इच्छा आहे हे त्याच्या मोठ्या भावाला माहिती होते.

कोल्हापुरात 'ललित पिक्चर' नावाची एक संस्था होती. त्यांना अभिनय करण्यासाठी तरूण हवेत अशी जाहिरात वर्तमानपत्रात आली होती.

मोठ्या भावाने रामचे काही निवडक फोटो अर्जाला जोडून अर्ज पाठवून दिला. रामची निवड झाली.

संगीताच्या वेडानेच त्यांने पुण्यातल्या सिनेटोनमध्ये संगीत विभागात प्रवेश मिळविला. तेथे तो हार्मोनियम वाजवत असे. प्रभात फिल्म कंपनीचे कोल्हापुरात स्थलांतर झाल्यावर त्या स्टुडिओत सम्राट फिल्म कंपनीतर्फे हिंदी व मराठी भाषेत 'नागानंद' (१९३५) नावाचा चित्रपट तयार केला. यात गाणारा तरुण अभिनेता हवा होता. यासाठी सी. रामचंद्र यांची निवड झाली.

'नागानंद' चे संगीतकार वामनराव सडोलीकर होते. त्यांच्याकडून प्रशस्तीपत्र घेऊन सी. रामचंद्र मिनर्व्हा मुव्हीटोनचे प्रसिद्ध निर्माता दिग्दर्शक सोहराब मोदी यांना भेटले. तिथले संगीतकार ग्यानदत्त, बी. एस. हुगल व मीरसाहेब यांच्याकडून त्यांनी महत्वाच्या बऱ्याच गोष्टी शिकून घेतल्या. सोहराब मोदी यांनी त्यांना संगीता बरोबरच गायनाचाही सल्ला दिला.

'लाल हवेली' या १९४४ साली प्रदर्शित झालेल्या चित्रपटात त्यांनी याकूब या अभिनेत्यासाठी पार्श्वगायन केले. याच काळात त्यांची मास्टर भगवान यांच्याशी ओळख झाली. त्यांनी 'वनमोहिनी' व 'जयकोंडी' या दोन तमिळ चित्रपटांसाठी सी. रामचंद्र यांना करारबद्ध केले.

नंतर मा. भगवान यांच्याच 'सुखी जीवन' या हिंदी चित्रपटला संगीत देऊन सी. राम चंद्र यांनी नवा अध्याय सुरू केला. तमिळ चित्रपटांसाठी संगीत देत असताना जयंत देसाई यांनी त्यांना सी. रामचंद्र हे नाव धारण करण्यास भाग पाडले. नंतर फिल्मीस्तान कंपनीत त्यांनी सफर (१९४६), शहंनाई (१९४७), साजन (१९४७), समाधी (१९५०), अनारकली (१९५३) यासारख्या अनेक अजरामर चित्रपटांना संगीत दिले. सी. रामचंद्र यांनी पाश्चिमात्य संगीत आणि वाद्य यांचा भारतीय संगीताशी बेमालूम मेळ घातला.

आणि संगीताच्या एका नव्या पर्वाला जन्म दिला. ज्यामुळे संगीत विश्वात एक नवीनच क्रांती उदयास आली. त्यांच्या संगीताच्या सप्तसुरांनी अवघे आसमंत व्यापून टाकले.

त्यांनी लता मंगेशकर याच्या सोबत गायलेली आणि संगीतबद्ध केलेली सन १९५१ मध्ये आलेल्या अलबेला मधील 'शाम तले खिडकी खुले तुम शिटी बजाना छोड दो' आणि 'भोली सुरत दिल के खोटे ' या गाण्यांनी लोकप्रियतेचे सगळे मापदंड पार केले. प्रेक्षक बेभान होऊन थिएटरमध्ये नाचू लागले. 'नींदिया धिरे से आजा रे अखियन मे' ही हिंदी लोरी (अंगाई गीत) लहान मुलांसाठी बाळकडू आहे. तर 'नवरंग' चित्रपटातील मदहोश करणारे 'आधा है चंद्रमा रात आधी' हे गाणे. यांसारखी अनेक गाणी लग्नाच्या वराती, दांडिया, आणि इतर कार्यक्रमात या गाण्यांची लोकप्रियता आजही कायम आहे.

१९४७ साली प्रदर्शित झालेल्या 'चूल आणि मूल' या मराठी चित्रपटासाठी सी. रामचंद्र यांनी संगीत दिग्दर्शन केले होते.

त्यांनीच मराठी चित्रपटांना आपल्या ठेवणीतल्या चाली दिल्या. आपले सहाय्यक दत्ता डावजेकर यांना त्यांनीच प्रथम गाणी ध्वनिमुद्रित करण्याची संधी दिली. १९५२ साली भालजी पेंढारकर यांच्या आग्रहाखातर त्यांनी 'छत्रपती शिवाजी' या चित्रपटाला संगीतबद्ध केले.

त्यांनी हिंदी आणि मराठी चित्रपटांत अभिनय, दिग्दर्शन, निर्माता, गायन, संगीत या सर्वच क्षेत्रात काम केले.

पण एक संगीतकार म्हणून ते अजरामर झाले. पाकिस्तानी आणि चिनी लष्कराने भारतावर जेव्हा हल्ला केला. त्या वेळेस 'ए मेरे वतन के लोगो' हे लता मंगेशकर यांच्या अवाजातील गाणे गाजत होते.

हे गाणे ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या डोळ्यात पाणी आले होते. कवी प्रदिप यांनी लिहिलेले हे देशभक्तीपर गीत सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते.

त्यांच्या सी. रामचंद्र या नावावरून ते तमिळी अथवा दाक्षिणात्य आहेत असा अनेकांचा समज होतो. पण या महाराष्ट्राच्या सुपूत्राने आपल्या अलौकिक संगीताने जगभरातील चाहत्यांना मंत्रमुग्ध केले. या अजरामर संगीतसुर्याचा अस्त सन ५ जानेवारी १९८२ साली झाला. **

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**–email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)